प्रेरणादायी
सुंदर सुविचार
आयुष्यातील काही गोष्टी कब्बडी
च्या खेळाप्रमाणे असतात तुम्ही
यशाच्या रेषेला हात लावताच काही
लोक तुमचे पाय पकडायला सुरवात करतात.

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३३१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.१२ जुलै २०२५

## पुढील ४८ तास धोक्याचे, महाराष्ट्रासह १६ राज्यांना हायअलर्ट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, मुंबई :** भारतीय हवामान विभागाकडून पुढील दोन ते तीन दिवस उत्तर – पश्चिम भारत आणि पुढचे चार ते पाच दिवस मध्य भारतामध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. आयएमडीनं दिलेल्या माहितीनुसार उत्तर-पश्चिम भारत आणि मध्य भारातामध्ये पुढील ४८ ते ७२ तास जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या सर्व पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडू अनेक राज्यांना हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे, नागरिकांना देखील सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार मध्य प्रदेश, हरियाणा, चंदीगढ, दिल्ली, हिमाचल प्रदेश, जम्मू, पंजाब आणि उत्तर प्रदेशच्या काही भागांमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. तर दुसरीकडे छत्तीसगढ, तटीय कर्नाटक, पूर्व उत्तर प्रदेश, झारखंड, महाराष्ट्र, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपूरा, ओडिशा राजस्थान, उत्तराखंड या राज्यांमध्ये देखील अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

पुढील ४८ तास धोक्याचे !

भारतीय हवामान विभागानं दिलेल्या इशाऱ्यानुसार पुढील ४८ ते ७२ तासांमध्ये अनेक राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. मध्य प्रदेश, जम्मू काश्मीर, हरियाणा आणि हिमाचल प्रदेश या राज्यांसाठी पावसाचा हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर दुसरीकडे महाराष्ट्रातही अनेक भागांमध्ये पावसाची शक्यता आहे.

महाराष्ट्रात काय स्थिती ?

महाराष्ट्रातही हवामान विभागाकडून जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, कोकणातील रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे, तर विदर्भातही हवामान विभागाकडून जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मराठवाड्यात देखील काही जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे.


दरम्यान गेले काही दिवस राज्यात जोरदार पाऊस सुरू आहे, विदर्भात मुसळधार पाऊस झाला. पावसामुळे अनेक भागांमध्ये मोठं नुकसान झालं आहे. नागपूर जिल्ह्याला पावसाचा चांगलाच फटका बसला, दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसामुळे अनेक घरांमध्ये पाणी घुसल्याचं पाहायला मिळालं. तर गडचिरोली जिल्ह्यात तब्बल सहा तालुक्यांचा जिल्हा मुख्यालयाशी संर्पत तुटला होता. आता पुन्हा एकदा विदर्भात जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्रात देखील पावसाची शक्यता आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या तब्बल १२ किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा प्राप्त

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, मुंबई :** महाराष्ट्रासाठी आनंदाची बातमी समोर येत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या तब्बल १२ किल्ल्यांना जागतीक वारसा स्थळाचा दर्जा प्राप्त झाला आहे. महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील १ जिंजी– या १२ किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक हेरिटेज दर्जा मिळाला– आज पॅरिसमध्ये झालेल्या मतदान पार पडलं त्यात निर्णायक बहुमत मिळवत राजांच्या किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान मिळालं.

सुमारे दीड वर्षांपूर्वी या किल्ल्यांचं वर्ल्ड हेरिटेज साइटसाठी नॉमिनेशन झालं होतं. आज फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे वारसास्थळात किल्ल्यांचा समावेश व्हावा यासाठी मतदान पार पडले. त्यावेळी अनेक देशांनी भारताच्या बाजूने मतदान केले आणि महाराजांच्या किल्ल्यांना बहुमान प्राप्त झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी रचलेल्या दुर्गराज्याचा ऐतिहासिक ठसा आता आंतरराष्ट्रीय स्तरावर



अधोरेखित झाला आहे. महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील १ अशा एकूण १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ म्हणून मानांकन मिळाले आहे. हा संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाचा व ऐतिहासिक क्षण ठरला आहे.

**जागतिक वारसास्थळांच्या यादीत समावेश करण्यात आलेले किल्ले**

या मानांकनासाठी सांस्कृतिक कार्य विभागाच्या अंतर्गत असलेल्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांच्यातर्फे प्रस्ताव तयार करण्यात आला होता. यामध्ये स्वराज्याची राजधानी रायगड, स्वराज्याची पहिली राजधानी राजगड, महाराजांनी ज्या किल्ल्यावर अफजलखानाला नेस्तनाबूत केले तो प्रतापगड, राजाचं जन्मस्थान शिवनेरी, स्वराज्याच्या नौदलाचं प्रमुख केंद्र जिथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या हाता पायांचे ठसे आहे तो सिंधुदुर्ग,लोहगड, साल्हेर, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, खांदेरी (महाराष्ट्र) आणि जिंजी (तामिळनाडू) यांचा समावेश होता.छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यातील किल्ले हे स्वराज्याच्या इतिहासाचे साक्षी आहेत. शिवराय, शंभुराजेंच्या मावळ्यांनी जीवाची बाजी लावत या किल्ल्यांचे रक्षण केले आहे. अनेक किल्ले तर शत्रुंच्या ताब्यातून जिंकले आहे. हे किल्ले राजांच्या मावळ्यांच्या शौर्यांची गाथा सागणारे आहेत. आणि आज या किल्ल्यांना जगातील वारसा स्थळात स्थान मिळाल्याने जगभर या किल्ल्यांचा डंका वाजणार आहे.

## दैनिक अक्षराज वृत्ताची दखल; पारनेर तालुक्यात युरीया खतांचे वाटप सुरू

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील कृषी दुकानदारांकडून युरीया खताच्या खरेदीसाठी इतर औषधांची सक्ती शेतकऱ्यांना करून लूट केली जात असल्याची माहिती शेतकऱ्यांनी निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांना दिली होती.

त्यानंतर खिलारी यांनी या प्रकरणाची शहानिशा करून कृषी विभागाकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार हा प्रकार सर्वप्रथम 'दैनिक अक्षराज' ने उघडकीस आणल्यानंतर कृषी विभागात खळबळ उडाली. अहिल्यानगर व पारनेर कृषी प्रशासनाने जिल्ह्यातील कृषी दुकानांची तपासणी चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. कृषी विभागाने या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. यासाठी वेगवेगळे पथक तयार करण्यात आले असून संबंधित शेतकऱ्यांच्या तक्रारी जाणून घेतल्या जात आहेत.

खरीप हंगामासाठी पारनेर कृषी विभागाने कृषी सेवा केंद्रावर शेतकऱ्यांसाठी युरीया खतांचे वाटप


दैनिक संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
मुख्य संपादक : विनोद गोरे मोबा.८६०५३१३२०२
शेतकऱ्याची लूट थांबवा अन्यथा तीव्र आंदोलन : बाळासाहेब खिलारी
पारनेर तालुक्यात युरियाची कृत्रिम टंचाई, जादा दराने अन्य खतांचे लिंकिंग करुन विक्री
अक्षराज : वसंत रांधवण
दि.०१, पारनेर (अहिल्यानगर)
कृषी दुकानदाराची शेतकऱ्याला अरेरावीची भाषा
- बबनराव झावरे, टाकळी ढोकेश्वर, स्थानिक शेतकरी
कृषी विभागाचे सोयीस्कर दुर्लक्ष...
Main Edition - 02 Jul 2025 - Page 3
Powered By Aksharaj Media

सुरू केले आहे. टाकळी ढोकेश्वर परिसरातील शेतकऱ्यांना आवश्यक असलेले खत मिळावे, यासाठी कृषी विभागाने योग्य नियोजन केले आहे. शुक्रवार, दिनांक ११ जुलै २०२५ रोजी सकाळी तालुक्यातील कृषी विभागातर्फे कृषी सेवा केंद्रावर युरीया खतांचे वाटप सुरू झाले आहे. शेतकऱ्यांना त्यांची नोंदणी आणि आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर युरीया खत उपलब्ध करून देण्यात येत आहे. टाकळी ढोकेश्वरमध्ये युरीया खरेदीसाठी शेतकऱ्यांनी गर्दी केली होती. शेतकरी रांग लावून उभे होते. प्रत्येक शेतकऱ्याला एक युरीया गोण मिळत आहे.



टाकळी ढोकेश्वरमध्ये युरीया खरेदीसाठी शेतकऱ्यांची गर्दी

पठार भागात सोयाबीन, लाल कांदा, भुईमूग, बाजरी, वाटाणा, मुग आदी पिकांची पेरणी शेतकऱ्यांनी केली आहे. पिकांची वाढ व पोषण होण्यासाठी पिकाला वेळेवर खत देणे आवश्यक असते. युरीया खताला शेतकऱ्यांची मोठी मागणी आहे. मात्र, वेळेवर खत उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. टाकळी ढोकेश्वर येथिल कृषी सेवा केंद्रात युरीया मिळत असल्याची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरली. त्यामुळे कृषी सेवा केंद्राबाहेर युरीया खरेदीसाठी रांगा लागल्या होत्या. पिकांना विविध खते व युरीया देणे गरजेचे आहे. पुन्हा त्याच दुकानदारांशी संबंध येणार असल्याने शेतकरी तक्रार देण्यास पुढे येत नाहित. याचाच फायदा कृषी दुकानदार घेत असल्याचे बोलले जात आहे.

**कृषी विभागाकडे तक्रार करा...**

इतर खते घेतली तरच युरीया मिळेल, असा नियम आहे का ? याबाबत कृषी अधिकारी पंचायत समिती यांच्याकडून माहिती घेतली. तर तसा नियम नाही, हे स्पष्ट झाले. शेतकऱ्यांची ज्या दुकानाबाबत तक्रार असेल, त्यांनी कृषी विभागाला तक्रार करून संपर्क करावा. त्यांच्यावर कारवाई केली जाईल, अशी माहिती दिली.

## थोडक्यात

### वैधता संपण्याआधीच शासनाचा पोषण आहार कचऱ्यामध्ये

### मनसेचा आक्रमक पवित्रा; प्रशासनाने चौकशीचे दिले आदेश



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.११, गुहागर (रत्नागिरी) :** महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत शाळांमध्ये पुरवण्यात येणारा पोषण आहार अंतीम मुदतपूर्व कचऱ्याच्या ढिगाऱ्यामध्ये आढळून आल्याची घटना समोर आली आहे. गुहागर तालुक्यातील जानवळे फाटा येथे रस्त्यालगत असणाऱ्या कचऱ्यामध्ये पोषण आहाराची पॅकेट टाकल्याचे दिनांक १० जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेना उपजिल्हाध्यक्ष विनोद जानवळकर यांच्या निदर्शनास आले. जानवळकर यांनी आक्रमक भूमिका घेत सदर पोषण आहार शाळेचा आहे की अंगणवाडीचा ? असा प्रश्न उपस्थित करत शासनाने याप्रकरणी तात्काळ चौकशी करून पोषण आहार कचऱ्यात टाकणाऱ्या संबंधितांवर कडक कारवाई करावी. अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक भूमिका घेईल असा इशारा जानवळकर यांनी प्रशासनाला दिला होता. गुहागर मनसेने आक्रमक पवित्रा घेतल्याने प्रशासन खडबडून जागे झाले असून शुक्रवार, दिनांक ११ जुलै २०२५ रोजी पंचायत समिती गुहागर गट विकास अधिकारी शेखर भिलारे यांनी घटनास्थळी पाहणी करून पोषण आहाराच्या खिचडीचे पॅकेट ताब्यात घेतले आहे. पुढील कारवाईसाठी तात्काळ चौकशीचे आदेश दिले आहेत.

### खासदार लंके यांच्या उपोषणास सुरुवात

### नगर मनमाड रस्त्याचे काम सुरू करण्याची मागणी




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, अहिल्यानगर :** जिल्ह्यासाठी महत्वाच्या असलेल्या एन.एच १६० या महामार्गाच्या रुंदीकरणाच्या कामात प्रचंड दिरंगाई होत असल्याने जनतेमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. या नाराजीची दखल घेत खासदार नीलेश लंके हे या कामास सुरुवात करावी. या मागणीसाठी आजपासून जिल्हाधिकारी अहिल्यानगर येथे बेमुदत उपोषणास बसले आहेत.

सावळीविहीर ते विळद नगर बायपास किमी या ७५ किलोमीटर लांबीच्या फोर लेन महामार्ग रुंदीकरणासाठी भारत कन्स्ट्रक्शन इंडिया प्रा. लि., देहरादून या कंपनीला ठेका देण्यात आला आहे. २१ मार्च २०२५ रोजी ठेका करार पार पडला होता. २९ एप्रिल रोजी सबंधित कंपनीस काम मंजूर होउन ही आज अखेर कोणतेही काम प्रत्यक्ष सुरू झालेले नाही. त्याविरोधात पत्रव्यवहार करण्यात येऊन ही दखल न घेतल्याने खासदार निलेश लंके यांनी उपोषणास्त्र उगारले आहे. या मागण्यांसाठी उपोषण तात्काळ प्रत्यक्ष कामास सुरूवात करावी, कामाची प्रगती व योजनाबद्ध वेळापत्रक सादर करावे, स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने पर्यायी व्यवस्था करावी, दिरंगाईस जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी यांसह अन्य महत्वाच्या मागण्यांसाठी निलेश लंके यांनी उपोषण सुरू केले आहे.

**अधिकाऱ्यांची चर्चा निष्फळ...**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी खासदार निलेश लंके यांनी उपोषण सुरू केल्यानंतर लगेच भेट घेऊन पावसामुळे २ महिने वाट पाहू त्यानंतर काम सुरू करू अशी भूमिका मांडली. मात्र खासदार निलेश लंके यांनी या रस्त्याची झालेली दुरवस्था त्यामुळे झालेले अपघात व नागरिकांचे गेलेले मृत्यू याची माहिती देत प्रत्यक्ष काम सुरू करा, तोपर्यंत मी आंदोलन मागे घेणार नाही अशी ठाम भूमिका मांडली. त्यामुळे अधिकाऱ्यांची शिष्टाई फळास आली नाही.

## संपादकीय

# रथयात्रा आणि रघुजी

ओडिशातील जगन्नाथपुरीची रथयात्रा एवढ्यातच आटोपली. नाशिकच्या जगन्नाथ रथयात्रेत नागपूरच्या मुधोजीराजे भोसले यांना सन्मानाने निमंत्रित करण्यात आले होते. मुधोजीराजे यांनी या शोभायात्रेत सहभागी होत, नागपूरच्या कर्तृत्वाचे स्मरण ठेवल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले. नागपूरकर भोसलेंना दिलेल्या या निमंत्रणामागे साधारण अतिथीभाव नव्हता. ओडिशा यात्रेसोबतच्या नागपूरच्या ऐतिहासिक संबंधांची त्याला कृतज्ञ पार्श्वभूमी आहे. इतिहासातील या शौर्यगाथेपासून अनेकजण अनभिज्ञ आहेत.

ओडिशाची राजधानी भुवनेश्वर. तिथून नजीकच्या जगन्नाथपुरी मंदिरातून दर वर्षी आषाढ शुक्ल द्वितीयेला रथयात्रा निघते. मध्य भारतातील राजा इंद्रद्युमने हजारो वर्षांपूर्वी रथयात्रेची परंपरा सुरू केली. स्कंदपुराणातील उत्कल खंडात हा उल्लेख येतो. श्रीकृष्ण, बंधू बलराम आणि बहीण सुभद्रा यांचे सुशोभित रथ यात्रेत असतात. चार किलोमीटरवरील गुंडीचा मंदिरापर्यंत हे रथ जातात. प्रत्येकाला तेराच पावले रथ ओढण्याची मुभा असते. मंदिरात भव्य पाकशाळा आहे. अंदाजे आठशे ते हजार आचारी सहकाऱ्यांसह सात भांड्यांची उतरंड रचून लाकडाच्या आचेवर प्रसाद बनवितात. सर्वात वरच्या भांड्यांतील अन्न सर्वांत आधी शिजते. ही परंपरा अतिशय रंजक आहे.

नागपूरकर रघुजी भोसलेंच्या लौकिकाला कर्तबगारीची किनार आहे. शाहू छत्रपतींनी कान्होजींना डावलून १७३८मध्ये सेनासाहेब सुभा हे पद रघुजी भोसलेंना दिले. रघुजी राजांनी गोंडवण आणि वऱ्हाडचा भाग स्वत:च्या अखत्यारित आणला. नागपूरला राजधानीचा दर्जा दिला. तोवर पूर्व आणि ईशान्येत रघुजींच्या सैन्याने वचक निर्माण केला. अटक ते कटक तलवार गाजविणाऱ्या रघुजींच्या चेहऱ्यावर भीतीचा लवलेशही नसे. बाजीराव पेशव्यांसोबतच्या युद्धात मराठ्यांचा वेढा पडल्याने निजाम भोपाळच्या किल्ल्यात अडकून पडला होता. त्याच्या मदतीसाठी वऱ्हाडातून निघालेल्या सुजावतखानाला याच रघुजींनी एलिचपुऱ्यात चारी मुंड्या चित केले. त्याला पळून जावे लागले. त्या काळात मध्य प्रदेश, ओडिशा, बंगाल, बिहारपर्यंत रघुजींच्या पराक्रमाच्या नौबती झडत होत्या.

रघुजी येईल या धास्तीतून बंगालमध्ये खंदक खणले गेले होते. मुघलांना जगन्नाथातील भव्यदिव्य रथयात्रेमागील जनश्रद्धा खटकायची. द्रव्यलोभातून अनेकदा मंदिरावर हल्ले झाले. औरंगजेबाने ते मंदिर पाडण्याचे ठरविले. मराठ्यांशी लढण्यातील व्यग्रतेने त्याचे स्वत:च्याच आदेशाकडे दुर्लक्ष झाले. मुघलांनी नंतर रथयात्रा बंद केली. रघुजीराजे भोसलेंनी बंगाल प्रांतावर आक्रमण करून सर्वांना सळो की पळो करून सोडले. अखेर १७५१मध्ये अलीवर्दी खानाला मराठ्यांशी शांतता करार करावा लागला. ओडिशा मराठ्यांकडे आले. त्यानंतर रघुजीराजेंनी धर्मशाळांसाठी ४० लाखांची देणगी देऊन जगन्नाथ यात्रा पुन्हा सुरू केली. मंदिराचा जीर्णोद्धार केला. अन्नछत्रांसाठी सात लाखांची स्वतंत्र तरतूद केली. प्रत्येक यात्रेच्या प्रारंभी नवा रथ तयार करण्याची परंपरा असल्याने दर वर्षी २० हजार रुपये देण्याचे औदार्यही मराठ्यांनी दाखविले. हा साहसी इतिहास सांगताना नागपूरच्या मुधोजीराजे भोसलेंचा अभिमान दाटून येतो. रथयात्रेत आजही त्यांना यथोचित मानसन्मान मिळतो.

मूळ नागपूरकर असलेल्या सरन्यायाधीश शरद बोबडे यांना एकदा जगन्नाथ मंदिर प्रशासनाने ऐतिहासिक रथाचे चाक सस्नेह भेट दिले. बोबडे यांनी नागपुरातील बंगल्याच्या दर्शनी भागात ते विशाल चाक उभारून ठेवले आहे. युद्धनैपुण्याच्या विषयात नागपूरकर रघुजीराजेंवर अन्याय झाल्याची खंत शरद बोबडे अनेकदा व्यक्त करतात. सध्या योगायोगाने सरन्यायाधीशपदाची धुरा वैदर्भीय भूषण गवईंकडे आहे. नागपूरच्या पराक्रमाकडे झालेल्या अक्षम्य दुर्लक्षाचे परिमार्जन कदाचित त्यांच्या पुढाकाराने होईल. विदर्भ म्हणजे अनुशेषग्रस्त आणि आळशी हे जोखड दूर सारण्यासाठी त्यांनी एक काम करावे. रघुजींच्या पराक्रमी इतिहासाला उजाळा देण्याचे निर्देश द्यावेत. नागपूरकरांची इच्छा त्यातून पुरी होऊ शकेल.

# वेगळ्या वेशभूषेतील गणेशमूर्ती बसवणे अयोग्यच !



श्री गणेशाचे रूप कसे आहे याचे यथोचित वर्णन श्री गणपती अथर्वशीर्षात आहे. गणेशचतुर्थीच्या निमित्ताने घरोघरी तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांत बसवण्यात येणाऱ्या गणेशमूर्तीही तशाच असायला हव्यात; मात्र प्रत्यक्षात असे घडताना दिसत नाही.

हल्ली बहुतांश सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये श्री गणेशाच्या मूर्तीपेक्षा सजावटीला अधिक प्राधान्य दिले जात असल्याने त्यानुरूप विविध वेशभूषेतील मुर्त्या आणल्या जातात. मुंबईतील काही मंडळांत भव्य गणेशमूर्ती हेच गणेशभक्तांचे आकर्षण केंद्र असल्याने काहीतरी वेगळे करायचे म्हणून दरवर्षी वेगवेगळ्या स्वरूपात आणि अन्य देवतांच्या, अवतारांच्या वेशभूषेत गणेशमूर्ती साकारल्या जातात. गणेशमूर्ती बनवणाऱ्या कारखान्यांमध्ये फेरफटका मारला असता यंदाही अनेक गणेशोत्सव मंडळांनी छत्रपती शिवाजी महाराज, भगवान श्रीकृष्ण, प्रभू श्रीराम, भगवान श्री शंकर, श्रीविष्णू, स्वामी समर्थ, साईबाबा आदींच्या वेशभूषेत गणपतीच्या मूर्ती बनवण्यासाठी ऑर्डर्स दिल्या आहेत. सर्व देवता आणि अवतार हे भक्तांचे कल्याण आणि दुष्ट प्रवृत्तीचा संहार करणाऱ्याच असल्या तरी प्रत्येक देवतेचे कार्य वेगवेगळे आहे,तसे त्यांचे उत्सवही वेगवेगळे आहेत, कृष्णजन्माष्टमीला आपण श्री गणेशाची मूर्ती घरी आणत नाही किंवा श्री रामनवमीला श्री गणेशाची शोभायात्रा काढत नाही मग श्री गणेश चतुर्थीच्या वेळी गणेशाला विविध वेषभूषांत का दाखवतो ? हिंदू धर्मातील प्रत्येक देवतेला विशिष्ट आकार आणि विशिष्ट वेशभूषा आहेत. त्यातून सिद्ध होणाऱ्या प्रतिमेतून अथवा मूर्तीतून त्या त्या देवतेचे तत्व आणि चैतन्य प्रक्षेपित होते असे धर्मशास्त्र सांगते. त्यामुळे मूर्तीला श्रीरामाच्या मूर्तीचा आकार दिला आणि शीर केवळ श्रीगणेशाचे लावले कि ती मूर्ती शत प्रतिशत श्रीगणेशाची होत नाही. कारण शरीराचे अन्य

जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क करा. ९६६४५५९७८०

अवयव आणि वेशभूषा ही श्रीरामाचीच असणार आहे. त्यामुळे श्रीगणेशमूर्तीवर असे प्रयोग करणे योग्य नाही. स्वामी समर्थांचे काही भक्त घरी स्वामींच्या वेशभूषेतील गणपती आणतात. साईबाबांचे भक्त साईबाबांच्या वेशभूषेतील गणेशमूर्ती बनवून घेतात तर छत्रपती शिवरायांचे कट्टर शिवभक्त चक्क छत्रपती शिवरायांच्या वेशातील गणेशमूर्ती ऑर्डर करून बनवून घेतात. अशा प्रकारच्या गणेशमूर्ती गणेश चतुर्थीच्या दिनी घरी आणणाऱ्याचा त्या त्या संतांविषयी आणि महापुरुषांविषयी श्रद्धेचा भाग असला तरी अशा प्रकारे आपल्या प्रतिमेला विघ्नहर्त्या श्रीगणेशाच्या स्वरूपात दाखवणे स्वामींना किंवा छत्रपती शिवरायांना कधीतरी आवडले असते का, याचा विचार ही मंडळी का करत नाहीत.

घरातील बच्चे कंपनीवर कार्टून विश्वातील पात्र, सुपरमॅन, बॅटमॅन यांसारख्या व्यक्तीरेखा यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात असतो त्यामुळे त्यांना खुश करण्यासाठी या पात्रांच्या रूपात गणेशमूर्ती साकारण्याच्या ऑर्डर्स पालकांकडून दिल्या जातात. अशा काल्पनिक पात्रांच्या वेशात श्रीगणेशाला साकारणे हा श्रीगणेशाचा अवमान नव्हे का ? गणेश चतुर्थीच्या दिवशी घरी आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तीच्या माध्यमातून साक्षात श्रीगणेशच आपल्या घरी अवतरणार आहेत. जोपर्यंत ते आपल्या घरी विराजमान आहेत तोपर्यंत त्यांची आपल्याला मनोभावे सेवा करायची आहे हा भाव २४ तास जागृत राहण्यासाठी श्रीगणेशमूर्तीही शास्त्रात सांगितल्याप्रमाणे चौरंगावर किंवा आसनावर विराजमान असलेली हवी. वेगवेगळ्या व्यक्तिरेखांच्या स्वरूपातील श्रीगणेशाला १० दिवस पुजून अनंत चतुर्दशीला या पुजलेल्या मूर्तीचे जेव्हा आपण विसर्जन करतो. तेव्हा हे विसर्जन नेमके श्री गणेशाच्या मूर्तीचे होते कि अन्य देवता, संत आणि महापुरुष यांच्या मूर्तींचे ? याचा विचार अशा मुर्त्या घरी आणणाऱ्यांनी करायला हवा. काही मंडळांमध्ये किंवा घरच्या सजावटींमध्ये श्री गणेशमूर्तीला चलचित्राच्या स्वरूपात दाखवले जाते, काही ठिकाणी पेटित पैसे टाकल्यावर श्रीगणेशमूर्ती उभी राहून पैसे टाकणाऱ्याला लाडूचा प्रसाद देतानाचे प्रयोजन केलेले असते. विविध धातूंच्या भांड्यांपासून, फळांपासून, सुक्यामेव्यापासून, चॉकलेटपासून गणेशमूर्त्या बनवल्या जातात. हासुद्धा श्रीगणेशाचा अवमानच आहे. गणेशोत्सवाच्या दरम्यान काही कंपन्या व्यावसायीक हेतूने श्रीगणेशाचा वापर आपल्या जाहिरातींमध्ये करतात. अशांवर गणेशाची कृपा होईल का ? आपल्याला पुरेसे धर्मशास्त्र ज्ञात नसल्याने धार्मिक सणांच्या आणि उत्सवांच्या बाबतीत 'मला सर्व कळते' या विचाराने आपण हवे तसे वागतो, हवे तसे करतो. धार्मिक सण शास्त्रीय दृष्ट्या कसे साजरे करावेत याबाबतचे सविस्तर लिखाण आपल्या ऋषीमुनींनी प्राचीन धर्मग्रंथांत हजारो वर्षांपूर्वीच मांडून ठेवले आहे. ते तसे साजरे केल्याने मनुष्याला उचित लाभ होतो आणि आनंदही मिळतो. याउलट आपण आपल्याच मनाप्रमाणे कारण्याचा प्रयत्न केल्यास लाभ तर होणार नाही उलट हानीच होण्याचा अधिक संभव असतो.

# घटस्फोटाचे वाढते प्रमाण चिंताजनक



श्याम ठाणेदार दौंड/पुणे
मो.९९२२५४६२९५

लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात असे म्हटले जाते. पूर्वी या गाठी घट्ट बांधल्या जायच्या कारण या गाठी आयुष्यभर तुटत नसायच्या. इतकंच काय तर हाच जोडीदार पुढील सात जन्मी मिळो अशी प्रार्थना पतिपत्नी देवाकडे करायचे. हल्ली मात्र या लग्नाच्या गाठी सैल बांधल्या जातात की काय अशी शंका येऊ लागली आहे कारण आयष्यभर सोडाच पण काही वर्षे देखील विवाह झालेले दांपत्य एकत्र नांदायला तयार नाहीत. लग्नानंतर अवघ्या काही वर्षात पतीपत्नीमध्ये वाद होतो आणि हा वाद थेट घटस्फोटापर्यंत पोहचतो. आज देशातील न्यायालयात घटस्फोटाचे लाखो याचिका प्रलंबित आहेत. दररोज त्यात भर पडतेच, घटस्फोटाची नवी याचिका दाखल झाली नाही असा एकही दिवस उगवत नाही. घटस्फोटाचे लाखो खटले प्रलंबित असल्याने सहा महिन्यांचा आत घटस्फोटाचा निकाल द्यावा असा निर्णय न्यायालयाने घेतला आहे. घटस्फोटाचे खटले तातडीने निकाली काढले जात असले तरी त्यात नव्याने भर पडत असल्याने न्यायालयही हतबल झाले आहे. वास्तविक दोन दशकांपूर्वी घटस्फोटाचे प्रकरण नगण्य स्वरूपात होते. शेवटचा पर्याय म्हणून घटस्फोटाकडे पाहिले जात होते आज मात्र अगदी किरकोळ कारणांवरून देखील घटस्फोट मागितला जातो. आज न्यायालयात दाखल होणाऱ्या घटस्फोटाची कारणे पाहिले तर चक्रावून जाल. पत्नीला साडी नेसता येत नाही, पत्नीने केलेला स्वयंपाक बेचव असतो, पत्नी सतत टीव्ही आणि मोबाईलवर असते, पत्नी आपला मान राखत नाही यासारख्या हास्यास्पद आणि मनाला न पटणाऱ्या कारणांनी घटस्फोट मागितला जातो. पत्नीकडूनही घटस्फोटाची अशीच काहीबाही कारणे दिली जातात. पती आपल्याला वेळ देत नाही. पती फक्त त्याच्या आई वडिलांचेच ऐकतो, पती आपल्याला बाहेर फिरायला नेत नाही, पती आपल्या मनासारखं वागत नाही अशी हास्यास्पद कारणे देऊन घटस्फोटाची मागणी केली जाते. घटस्फोटाची ही किरकोळ कारणे जितकी हास्यास्पद वाटतात तितकीच ती चिंताजनक देखील आहेत कारण अशा किरकोळ कारणांनी जर घटस्फोट होऊ लागला तर विवाह संस्थाच धोक्यात येईल. याशिवाय पती मारहाण करतो, अनैसर्गिक संबंधांची मागणी करतो, पत्नी उलट बोलते, पती म्हणून मान देत नाही अशा कारणांनी देखील घटस्फोटाची मागणी केली जाते अशी आणि यापेक्षाही अनेक वेगवेगळी कारणे घटस्फोटासाठी दिली जातात अर्थात सर्व कारणांचा अभ्यास करूनच न्यायालय घटस्फोटाचा निकाल देते. अर्थात अशा किरकोळ कारणांसाठी घटस्फोटाची मागणी करणे कितपत योग्य आहे याचा विचार दोघांनीही करायला हवे. नाते कोणतेही असो त्यात राग रुसवा असतोच, संसार म्हटले की भांड्याला भांडे लागतेच, जर दोघात वाद झाला की दोघांपैकी एकाने शांत राहावे थोड्या वेळात राग शांत होतो आणि वादही मिटतो मात्र शब्दला शब्द दिला की वाद वाढतो आणि वादाचे रूपांतर मोठ्या भांडणात होते. त्यात दोन्ही कडील नात्यात कोणीना कोणी तेल ओतणारा असतोच, असे तेल ओतणारे व्यक्ती आल्यास हा वाद थेट न्यायालयात पोहचतो. अगदी क्षुल्लक कारणही नाते तोडायला पुरेसे ठरत असल्याने नात्याची गुंफण घालताना थोडे सावरूनच वागावे लागते. माझे चुकलेच हे मनाने मान्य करावे लागते. तरच नाते टिकते आणि त्यातही गोडवा राहतो. नात्यात सर्वात महत्वाचा असतो तो विश्वास. जर विश्वासाला तडा गेला तर नात्यात वितुष्ट येतेच म्हणून पतिपत्नी मध्ये विश्वास खूप महत्वाचा आहे विश्वासाला तडा जाऊ न देण्याची जबाबदारी दोघांचीही आहे. नात्यात दुरावा होण्याचे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे पतीपत्नीमध्ये असलेला अहंकार. अहंकारामुळेच नाती तुटतात म्हणूनच दोघांनीही अहंकार दूर ठेवायला हवा. अहंकाराला दूर ठेवून परस्परावरील विश्वास कायम ठेवला तर नात्यात दुरावा निर्माण होणार नाही आणि घटस्फोटाचे प्रमाणही कमी होईल.



## साधू...

सवय अशी काहींना
हळू कार्य भाग साधू
फसवे सहजी जनते
रे असंख्य संधी साधू

कफनी नेसून केवळ
होत ना कुणीचं साधू
आंधळे करी डोळसा
जे विचारांने भ्रष्टअधू

अल्मतीची भानामती
करेहैदोस काळीजादू
डिग्रीधारकाही फसवे
अधिक चाणाक्ष भोंदू

इलाज अ साध्य रोगां
करती अशिक्षित वैदू
नेत्यांनाकरायचे लक्ष्य
सहजलक्ष सर्वांचे वेधू

संभ्रमास मानते सत्य
अक्कल का तकलादू
खेळ खंडोबा विद्येचा
स्वमते दुस-यांवरलादू

सावरावे स्वतावेळेवर
अंधश्रद्धा रे समुच्छेदू
श्रध्दा हवी ती डोळस
अंतर्मनप्रयासे अंतर्भेदू

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

# माझ्या शेतकरी आईची दुरदृष्टी

माझ्या आईचे माहेर राजापूर तालुक्यातील ताम्हाणे येथील विष्णू ताम्हाणकर यांच्या घरात जन्म झाला आठ बहिणींमध्ये हिचा क्रमांक सहावा होता. दोन भाऊ, आई - वडील एवढे मोठे कुटुंब. विवाहानंतर तिचे सासर लांजा तालुक्यातील गोळवशी, येथील शिवराम गोळवसकर यांच्याशी विवाह झाला. शेतकरी कुटुंबात आली.घरात दिर, जावा, त्यांची मुले, सासु, सासरे, जनावरे- गुरे वासरे, गाई, म्हशी, बैल, घर, दोन वाडे एवढा मोठा परिवार. उदरनिर्वाह शेतीवर. माझे वडील मुंबईतील न्यु मिल कापड गिरणीत कामगार होते.ते खाणावळीत राहून एका ठिकाणी जेवायला तर दुसर्या ठिकाणी झोपायला असा त्यांचा दिनक्रम होता. आई माझी शेतकरी म्हणून भात लावणीच्या दोन जोते बांधत तेव्हा माझ्या चुलत्यांच्या मागून दुसरे जोत धरी. कौल तोडणीच्या वेळी झाडांवर चुढून कौल तोड करी. तिला विवाह समारंभात गाणी म्हणण्याची आवड होती,तांबीट गवतापासून विविध प्रकारच्या वस्तू बनविण्याचा छंद होता. मी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १९७१ साली चौथी पास झालो. तेव्हा माझ्या आईने मोठा निर्णय घेतला माझे पुढील शिक्षण मुंबई व्हावे अशी तिची इच्छा होती. वडील कुर्ल्यातील तानाजी चौकातील एका कुटुंबात खानावळीत होते त्यांच्याकडे ५-६ लोक खानावळीत होते.माझ्या वडीलांनी त्यांना विचारले होते की, माझ्या मुलाला शिक्षणाकरता मुंबईत बोलत आहे त्याला जेवायला ठेवाल काय ? तेव्हा मी अकरा वर्षाचा होतो. त्यांनी होकार देताच वडीलांनी आईला कळविले. गावातील मुंबईत येणार्या कोणाबरोबर मला पाठवा असा निरोप दिला. माझ्या शेतकरी आईचा तो निर्णय माझ्या आयुष्यातील महत्वाचा टप्पा ठरला.कुर्ल्यातील मॅचफॅक्टरी लेन येथील मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत वडीलांच्या ओळखीच्या व्यक्तीनी इयत्ता पाचवीत प्रवेश मिळवून दिला. वडीलांव्यतिरिक्त मुंबईत माझ्या ओळखीचे कोणीही नव्हते. माझा दिनक्रम वडिलांप्रमाणेच सुरू झाला. एका ठिकाणी जेवायला तर दुसर्या ठिकाणी झोपायला. वडील कापड गिरणीत नोकरीत होते. त्यांना तीन पाळ्यात कामावर जावे लागे. अतिशय कठीण परिस्थितीत माझे बालपण मुंबई गेले. शिक्षण झाले. नोकरी मुंबई महानगरपालिकेत मिळाली.विवाह झाला. पुत्र प्राप्ती झाली. संसारात अनेक संकटांचा सामना करीत मार्गक्रमण केले. आईच्या दूरदृष्टीचा माझ्या जीवनात आमुलाग्र बदल झाला.माझ्या पुढची पिढीने एक पाऊल पुढे टाकून अभियांत्रिकीत पदव्युत्तर पदवी मिळविल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठी मुलगा अमेरिकेत गेला. माझ्या आईचे निधन १२ जुलै २०१० रोजी निधन झाले. मागील १५ वर्षांत आईचे छत्र हरपले तरी तिचे विचार मला प्रेरणा देतात. आईच्या चरणी नतमस्तक होऊन विनम्र अभिवादन करतो. आई विना सर्व व्यर्थ आहे हेच खरे. प्रचंड मेहनत, वेदना सहन करून आपल्या कुटुंबाकरता अहोरात्र झटते तरी कधीच नाराजी व्यक्त करीत नाहीत हीच माय माऊली चंदनासारखी झिजते, हे मला मी बाप झाल्यावर कळले.

आईच्या आईपणास भावपूर्ण आदरांजली.

✻ महादेव गोळवसकर ✻
कुर्ला मुंबई
९८६९४७६२०९

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महाबळेश्वर ते पोलादपुर मार्गावर, दरड कोसळल्यामुळे रस्ता वाहतुकीसाठी बंद



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.११, महाबळेश्वर (सातारा) :** सध्या महाबळेश्वर व आसपासच्या परिसरा मध्ये पावसाचा जोर वाढला असून महाबळेश्वर ते पोलादपूरला जाणाऱ्या रस्त्यावरती पोलादपूर हद्दी मध्ये दरड कोसळली असल्याने महाबळेश्वरहून पोलादपूर ला प्रवास करणाऱ्या वाहनांसाठी हा रस्ता पुढील ४ ते ५ दिवस बंद करण्यात आला आहे .

पोलादपूर भागात दरड हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून या बाबत पोलादपूर तहसीलदार यांच्या मार्फत महाबळेश्वर तहसीलदार यांना सदर घटनेची माहिती देत सुरक्षिततेच्या कारणास्तव तसेच या मार्गे वाहतून करणाऱ्या प्रवाशाला त्रास होऊ नये. या दृष्टीने महाबळेश्वर ते पोलादपूर प्रवास करण्या प्रवाश्यांना महाबळेश्वर येथे सूचना देण्या बाबत कळवले आहे. यांचीच दखल घेत पोलादपूर कडे जाणाऱ्या वाहनांना महाबळेश्वर येथील महाड नाका परिसरात वाहन चालकांना सूचना करून दुसऱ्या मार्गे पाठविले जात आहे.

# महानिर्मितीकडे कंत्राटदारांची ३ महिन्यांचे देयके थकीत



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.११, नागपूर :** राज्यातील महानिर्मितीच्या औष्णिक वीज केंद्रात कार्यरत कंत्राटदारांची मागील तीन महिन्यापासूनचे देयके थकीत असून प्रलंबित देयके कंत्राटदारांना अविलंब मिळावे, अन्यथा राज्यातील औष्णिक विद्युत केंद्राचे सर्व कंत्राटदार कंत्राटी कामगारांचे या महिन्याचे मासिक वेतन देणार नाहीत नाहीत, तसे झाल्यास कंत्राटी कामगारांमध्ये असंतोष निर्माण होऊन केंद्रात कायदा आणि सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कंत्राटदारांची तीन महिन्यांचे प्रलंबित थकीत देयके अविलंब मिळावे, अशी मागणी खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनतर्फे संबंधितांना पाठविलेल्या निवेदनातून केलेली आहे

मागणीचे निवेदन ऊर्जामंत्री, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक, (संचलन) संचालक व (वित्तीय) संचालक, खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता यांना दिलेले आहे. वीज निर्मिती केंद्रात काम करणाऱ्या कंत्राटदारांची कोट्यवधी रुपयांची देयके महानिर्मितीकडे थकीत असून कंत्राटदारांना वेळेवर देयके प्राप्त होत नसल्याने कंत्राटदार मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणीत आलेले आहेत.

## कंत्राटदार आले आर्थिक अडचणीत

परिणामी त्यांच्याकडे असणाऱ्या कंत्राटी कामगारांनाही वेळेवर वेतन देण्यात आर्थिक अडचणी येत असल्याने कामगारांचे वेतन वेळेवर न झाल्यास कामगारांच्या कुटुंबाची उपासमार होण्याची शक्यता आहे. म्हणून महानिर्मितीकडून कंत्राटदाराचे प्रलंबित थकीत देयके त्वरित मिळावे.

कोरोना साथीच्या काळापासून वीज निर्मितीतील कंत्राटदारांचे देयके पूर्ण दिल्या जात नाहीत किंवा विलंबाने प्राप्त होतात. अनेक कंत्राटदार मोठ्या आर्थिक अडचणीत आले आहेत. प्रत्येक कंत्राटाची देयक सादर करतांना कंत्राटदाराला जीएसटी, कामगारांचा पीएफ, वेल्फेअर फंडची रक्कम पूर्णपणे भरावी लागते. एकीकडे महानिर्मितीकडून कंत्राटदारांची देयके वेळेवर व पूर्णपणे देत नसतानाही महानिर्मितीकडून कामगारांचे वेतन व इतर भत्यांची रक्कम दर महिन्याच्या दहा तारखेच्या आत करण्याची सक्ती कंत्राटदारांना केली जाते. अशा स्थितीत कंत्राटदार मोठ्या आर्थिक अडचणीत आला आहे. जीएसटी, पीएफ थकीत राहिल्यास संबंधित विभागाकडूनही कंत्राटदाराला वारंवार पत्र दिले जाते आणि न भरल्यास विलंब शुल्क लागतो. अनेक कंत्राटदारांनी कर्ज काढले असून काहींना आपल्याकडे असलेले संपत्ती गहाण ठेवून, सोने तारण ठेवून निधी उभारावा लागत आहे. अशीच स्थिती राहिल्यास कंत्राटदारांवर आर्थिक संकट ओढवेल. कामगारांना वेळेवर वेतन न मिळाल्यास त्यांच्यातही असंतोष निर्माण होऊ शकतो त्याचा परिणाम म्हणून वीज निर्मितीत कामगारांच्या असंतोषाचा सामना करावा लागेल, त्याची संपूर्ण जबाबदारी महानिर्मितीची राहील. कंत्राटदाराच्या मागणीकडे विशेष बाब म्हणून ऊर्जा मंत्र्यांनी स्वतः जातीने लक्ष द्यावे,अशी मागणी खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप बनसोड व महासचिव दिवाकर घेर यांनी संबंधितांना पाठवलेल्या निवेदनातून केली आहे.

## वर्ल्ड फॉर नेचर इंडिया नागपूर जिल्हा अध्यक्षपदी सर्पमित्र दद्दु गणवीर यांची निवड



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.११, नागपूर :** वन्यजीव संरक्षण व पर्यावरण संरक्षणाचे कार्यात दिलेल्या योगदानाबद्दल वर्ल्ड फॉर नेचर इंडिया संघटनाच्या जिल्हाध्यक्ष पदावर महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अभिजित वाघमोडे यांनी सर्पमित्र दद्दु गणवीर यांची नियुक्ती केली आहे.

सर्पमित्र दद्दु गणवीर यांनी निसर्ग सेवा व वन्यजीव आणि इतर पाण्यासाठी भरीव योगदान दिले आहे. खापरखेडा परिसरात कुठेही साप किंवा अन्य वन्यप्राणी आढळून आल्यास सर्पमित्र दद्दु गणवीर निःशुल्क सेवा देत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत अनेक सामाजिक संघटनांनी त्यांचा गौरव करून सत्कार केला आहे.


नागपूर जिल्ह्यात प्राणी व पर्यावरण संरक्षण समस्या बाबत निराकरण करण्याचा प्रयत्न करणार आहे, शिवाय नागपूर जिल्ह्यात वर्ल्ड फार नेचर इंडिया या संघटनेचे संघटन वाढवण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणार असल्याचे सर्पमित्र दद्दु गणवीर यांनी सांगितले. सर्पमित्र दद्दु गणवीर यांची नागपूर जिल्हा अध्यक्ष पदावर नियुक्ती झाल्यामूळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# हिमायतनगर येथील नालंदा बुद्ध विहारात वर्षावासास प्रारंभ

## भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ पठनास सुरुवात...

**अक्षराज : रमेश पंडित**

**दि.११, हिमायतनगर (नांदेड) :** येथील नालंदा बुद्ध विहार येथे भारतीय बौद्ध महासभा शाखा हिमायतनगरच्या वतीने दिनांक १० जुलै रोजी सायंकाळी ७:०० आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा पर्यंत चालणाऱ्या वर्षाला प्रारंभ केला आहे.




यावेळी प्रमुख पाहुणे आयु. कैलास पंतिंगराव, तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रताप लोकडे, सुरेश गडपाळे, विश्वनाथ खिराडे, संजय वाघमारे, तसेच एम.यू हनवते, या भारतीय बौद्ध महासभा शाखा हिमायतनगर येथील पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी या सोहळ्याला प्रारंभ झाला असून, बौद्ध समाजात अत्यंत महत्त्वाचा समजला जाणारा वर्षावास एक पवित्र तीन महिन्याचा कार्यकाळ असतो. कार्यक्रमाच्या प्रारंभी महामानवाच्या प्रतिमा पुष्प पूजन संपन्न झाल्यानंतर भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी आयु. सुरेश गडपाळे यांनी वर्षावासाचे महत्त्व कथित केले, बुद्ध आणि त्यांचा धम्म या पवित्र ग्रंथाचे वाचन आयु. एम .यु. हनवते यांनी केले. सदरील वर्षावास सोहळा तीन महिने चालणार असून ग्रंथ वाचन कार्यक्रमासाठी परिसरातील बौद्ध उपासक उपासिका तसेच बालक बालिका यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## स्व.अमोल आबादार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ९३७ रक्तदात्यांनी रक्तदान केले



**अक्षराज : साहेबराव जाधव**

**दि.११, मुदखेड (नांदेड) :** स्व.अमोल आबादार हे समाजहितासाठी कायम प्रयत्नशील होते. अमोलसारखा तरुण सहकारी आपल्यातून गेल्याचं दुःख आहे. विश्व हिंदू परिषद व भाजपा मध्ये अमोल यांनी केलेले काम उल्लेखनीय आहे. अमोल आबादार यांचे कार्य हे मोलाचे असून आबादार कुटुंबिय व सर्व तरुण सहकाऱ्यांना आपले नेहमी विधायक लोक कल्याणकारी कामासाठी सर्वोतोपरी सहकार्य राहील असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांनी स्व. अमोल आबादार यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित भव्य रक्तदान आणि आरोग्य शिबीर प्रसंगी बोलताना केले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार तथा भाजपाचे महानगराध्यक्ष अमरनाथ राजुरकर मध्यवर्ती बँकेचे संचालक गोविंदराव पाटील शिंदे नागेलीकर उद्योजक मारोतराव कवळे गुरुजी, स्व. डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड, भाजपाचे तालुकाध्यक्ष दत्तू देशमुख वाडीकर शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण, भीमराव पाटील कल्याणे, मारोती पाटील जाधव, डॉ. संदीप पचलिंग, माधवराव पा. कदम, माधवराव पा. शिंदे, रत्नाकर पा. शिंदे, गणेशराव पा. शिंदे, तहसीलदार आनंद देऊळगावकर मुख्याधिकारी शैलेश फडसे, पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण, ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. वृषाली येमेकर बालाजी पाटील खटिंग स्वर्गीय अमोल आबादार यांचे वडील बबनराव आबादार, आई सुनिता ताई आबादार, भाऊ राम आबादार, बहिण सुजाता आबादार यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुदखेड शहरांमध्ये पहिल्यांदाच म. गांधी विद्यालयातील सह शिक्षक संजय राजे यांच्यासह शहरी व ग्रामीण भागातील जवळपास ९३७ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. नांदेड येथील शासकीय रुग्णालयांतील रक्तपेढी व अन्य पाच रक्तपेढयांनी रक्तदात्याची एक संकलन केले. आरोग्य शिबिरा दरम्यान ३८२ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली व मोफत आरोग्य शिबिराचा देखील गरजू रुग्णांनी लाभ घेतला. या निमित्ताने मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपणही करण्यात आले. शहरातील गणपती मंदिराच्या प्रांगणात आयोजित या रक्तदान व आरोग्य शिबिरास तरुण कार्यकर्ते व बजरंग दल विश्व हिंदू परिषद हनुमान चालीसा समिती यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# अन्न व औषध प्रशासनाची हिमायतनगर शहरात येऊन कार्यवाही!

## हिमायतनगर येथे किराणा दुकानामधून केला जात होता गुटखा सप्लाय...

**अक्षराज : लक्ष्मण शेन्नेवाड**

**दि.११, हिमायतनगर (नांदेड) :** सहायक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन कार्यालय, नांदेड येथील पथकाने हिमायतनगर शहरात चालू असलेल्या अवैध गुटख्या संदर्भात माहिती मिळताच अचानक भेट देऊन शहरातील प्रणव किराणा स्टोअर्स व सलीम किराणा स्टोअर्स या किराणा दुकानांची तपासणी केली. तपासणी वेळी मे. प्रणव किराणा स्टोअर्स, दीक्षाभूमी चौक, हिमायतनगर या पेढीतून दीपक हरिश्चंद्र अमृतसागर वय वर्ष २८ रा. कालिका नगर हिमायतनगर या व्यक्तीच्या ताब्यातून राजनिवास सुगंधीत पानमसाला, विमल पानमसाला, डायरेक्टर स्पेशल पानमसाला, मुसाफीर पानमसाला, सागर पानमसाला, गुटखा, विविध प्रकारचे सुंगधीत तंबाखू इत्यादी प्रतिबंधित अन्न पदार्थाचा एकूण २७ हजार ६८८ रुपये प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा जप्त केला. संबंधित हजर व्यक्ती दीपक हरिश्चंद्र अमृतसागर वय वर्ष २८ रा. कालिका नगर, हिमायतनगर यांच्याविरुद्ध अन्न सुरक्षा अधिकारी ऋषिकेश मरेवार यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६चे कलम २६,२७,३०(२)(अ),५९ भारतीय न्यायसंहितेच्या १२३,२२३,२७४,२७५ कलमानुसार पोलीस स्टेशन, हिमायतनगर येथे फिर्याद दाखल केली आहे.




याबाबत सविस्तर वृत्त असे की शहरात राजरोसपणे अवैध गुटखा विक्री होत असल्याचे गोपनीय माहिती मिळताच मे.सलीम किराणा स्टोअर्स, खुबा चौक, हिमायतनगर या पेढी तपासणी वेळी राजनिवास सुगंधीत पानमसाला, विमल पानमसाला, सागर पानमसाला, गुटखा, विविध प्रकारचे सुंगधीत तंबाखू इत्यादी प्रतिबंधित अन्न पदार्थाचा एकूण १ हजार ९५० रुपये एवढ्या किंमतीचा साठा आढळला. या पेढीतील हजर व्यक्ती अब्दुल अहमद लाल मोहम्मद वय वर्ष ४७ रा. सुभाष चौक, हिमायतनगर व पेढी मालक अब्दुल जब्बार अब्दुल मजीद खुबा चौक, हिमायतनगर यांच्या विरुद्ध अन्न सुरक्षा अधिकारी, अनिकेत भिसे यांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६चे कलम २६,२७,३०(२)(अ),५९ भारतीय न्यायसंहितेच्या १२३,२२३,२७४,२७५ कलमानुसार पोलीस स्टेशन, हिमायतनगर येथे फिर्याद दाखल केली आहे.

तपासणी नंतर सदर दोन्ही पेढी सील करण्यात आल्या. सदरची कार्यवाही सहायक आयुक्त राम भरकड व सहायक आयुक्त संजय चट्टे यांचे मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी सर्वश्री ऋषिकेश मरेवार, अनिकेत भिसे, अरूण तम्मडवार तसेच प्रशिक्षणार्थी अन्न सुरक्षा अधिकारी अविनाश गिरी, शिल्पा श्रीरामे, अमृता दुधाटे, नमुना सहायक बालाजी सोनटक्के व पोलीस निरीक्षक अमोल भगत व इतर पोलीस कर्मचारी यांच्या सहकार्याने पार पडली पुढील तपास अन्न सुरक्षा अधिकारी नांदेड हे करीत आहेत.

# चंद्रपूर-नागपूर महामार्गाच्या दुरावस्थे विरोधात खा.प्रतिभा धानोरकर यांचा एल्गार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११ चंद्रपूर :** चंद्रपूर-नागपूर महामार्गाच्या दयनीय अवस्थेविरोधात आणि सुरु असलेल्या टोलवसुलीच्या विरोधात चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी तीव्र आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांवी सार्वजनिक बांधकाम मंडळाच्या अधीक्षक अभियंत्यांना पत्र लिहून या गंभीर समस्येकडे लक्ष वेधले असून, रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याची आणि रस्ता सुस्थितीत येईपर्यंत टोलवसूली थांबवण्याची मागणी केली आहे. खा. प्रतिभा धानोरकर यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे. चंद्रपूर-नागपूर महामार्गावर अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडलेले आहेत. पावसाळ्याला सुरवात झाल्याने ही समस्या अधिकच गंभीर झाली असून, वाहनचालकांना आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहेत. या दुरावस्थेमुळे भविष्यात मोठे अपघात होण्याची आणि जीवितहानी हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही त्यांनी अधोरेखित केले आहे.

हा महामार्ग बीओटी(बांधा-वापरा-हस्तांतरित करा) तत्वावर बांधण्यात आला आहे. या तत्वांनुसार चांगल्या प्रतिच्या रस्त्यांसाठी टोल आकारणे अपेक्षित असताना, एका बाजुला रस्त्यांवर मोठमोठे खड्डे असताना, त्याच खराब रस्त्यासाठी टोलवसुली सुरु असणे हे पूर्णपणे चुकीचे धोरण



असून, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, असे खा. धानोरकर यांनी ठणकावून सांगितले आहे. या पार्श्वभूमीवर, त्यांनी अधीक्षक अभियंत्यांना विनंती केली आहे कि, चंद्रपूर-नागपूर महामार्गाची तात्काळ आणि प्राधान्याने दुरुस्ती करण्यात यावी. तसेच, जोपर्यंत रस्त्याची दुरुस्ती पुर्ण होऊन तो वाहतुकीसाठी सुस्थितीत येत नाही, तोपर्यंत सदर महामार्गावरील टोलवसुली थांबवण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असेही त्यांनी पत्रात नमुद केले आहे.

या गंभीर प्रश्नावर खा. प्रतिभा धानोरकर यांनी घेतलेली आक्रमक भूमिका चंद्रपूर जिल्ह्यातील नागरिकांसाठी दिलासादायक असून, त्यांच्या या प्रयत्नामुळे चंद्रपूर-नागपूर महामार्गावरील प्रवासाचा अनुभव सुरक्षित आणि सुखकर होईल, अशी अपेक्षा आहे. या पत्राची प्रत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १ , चंद्रपूर आणि प्रकल्प संचालक, महामार्ग प्राधिकरण, चंद्रपूर यांनाही पाठविण्यात आले आहे.

# गटारीच्या तोंडावर, बारवाले संपावर...?

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.११, मुंबई :** गटारी म्हणजे मद्यप्रेमींच्या जीवनातील आनंदाचा दिवस. या दिवशी वर्ष भर दारू पिणारे देखील या दिवसाचा मनसोक्त आनंद घेऊन भरपूर दारू पिऊन एन्जॉय करत असतात. थोडक्यात काय तर गटारी म्हणजे तमाम मद्यप्रेमींचा एन्जॉय करण्याचा एक आगळा वेगळा दिवस.




म्हणुनच तर या दिवशी प्रत्येक शहरातील बार ३१ डिसेंबर प्रमाणे सजवून मद्यप्रेमी ग्राहकांसाठी वाट पहात असतात. शिवाय या उत्सवाच्या दिवशी राज्यभरातील सर्व बार रात्री उशिरा पर्यंत मद्य प्रेमी ग्राहकांनी फुललेले असतात.

इतर वेळी देखील काम संपलं की 'बसायचं', मित्र भेटले की 'बसायचं', एकटं वाटू लागलं की 'बसायचं' अशी सवय अंगवळणी पडलेल्या तमाम दारूप्रेमींसाठी एक धक्कादायक बातमी आहे.गटारी तोंडावर आलेली असतानाच बारवाल्यांनी संपावर जाण्याचा इशारा दिलाय. दारूवरील करवाढी विरोधात राज्यभरातील बारवाले आक्रमक झालेत. त्यामुळे सरकारला त्यांनी २ दिवसांचा अल्टीमेटम दिलाय.

गटारीच्या तोंडावरच बारवाल्यांनी संप पुकारल्यास मद्यप्रेमींची अडचण होण्याची शक्यता आहे.गटारी म्हटलं की मद्यप्रेमींमध्ये आनंदाचं वातावरण असतं.

मात्र या गटारीला मद्यप्रेमींची काहीशी नाराजी होण्याची शक्यता आहे. कारण, ऐन गटारीच्या तोंडावर बारवाले संपावर जाण्याच्या तयारीत आहेत. या बातमीनं मद्यप्रेमींना झटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. दारूवरील करवाढ कमी करा अन्यथा परमिट रूम बंद करू, असा थेट इशारा इंडियन हॉटेल अँण्ड रेस्टॉरंट असोसिएशननं सरकारला दिलाय. इतकंच नाही तर दोन दिवसांचा अल्टिमेटमही देण्यात आलाय.

**दारूविक्रीवर व्हॅट अर्थात व्हॅल्यू अॅडेड टॅक्स ५ वरून १० टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला**

– तर दारूविक्रीसाठी लागणाऱ्या परवाना शुल्कात १५ टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आली

– उत्पादन शुल्कातही वाढ करण्यात आली

– सरकारच्या या अन्यायकारक करवाढीमुळे उद्योग संकटात सापडल्याचा दावा

– करवाढ कमी करण्यासाठी २ दिवसांचा इंडियन हॉटेल अँण्ड रेस्टॉरंट असोसिएशनचा अल्टीमेटमसरकारनं हॉटेल व्यवसयावर खास करून दारूवर वाढवलेला व्हॅट हा हॉटेल उद्योगांसाठी मारक असल्याचं हॉटेल असोसिएशनचं म्हणणं आहे.

सरकारनं तातडीनं करवाढ कमी करावी अन्यथा बेमुदत हॉटेल बंद आंदोलनाचा इशारा हॉटेल संघटनेनं दिला आहे. दरम्यान आता गटारी अमावस्या तोंडावर आलीय. गटारीसाठी उत्सुक असलेले मद्यप्रेमी परमिट रुमकडे धाव करत असतात. मात्र गटारीच्या तोंडावरच बारवाल्यांनी संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे बारवाले संपावर गेल्यास मद्यप्रेमींची चिंता वाढण्याची शक्यता आहे.

# सिस्पे या बनावट कंपनीने नगर जिल्ह्यातील गुंतवणूकदारांना ११०० कोटीचा लावला चुना

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.११, सुपा (अहिल्यानगर) :** सिस्पे सारख्या बनावट कंपन्या वेगवेगळ्या नावाने बाजारात आल्या आणि मार्केटमध्ये ठेविदारांना दरमहा ११ टक्क्यांपासून तर १५ टक्के व्याज परतावा म्हणून दर महिन्याला देणार असे अमिष दाखवून काही काळ हा परतावा दिला, असे अमिष दाखवत अहिल्यानगर जिल्यातील पारनेर, श्रीगोंदा, पुणे जिल्यातील शिरुर तालुक्यातील जवळपास १५०० कोटीपेक्षा अधिक रक्कमेची फसवणूक झाल्याचे चित्र आज पाहायला मिळते.

सिस्पे ह्या बनावट कंपनीचा मूळ सूत्रधार नवनाथ अवताडे, अगस्थी मिश्रा यांच्यासह कंपनीच्या १२ संचालका विरोधात श्रीगोंदा तालुक्यात गुन्हा दाखल झाला आहे. कंपनीचा मूळ सूत्रधार नवनाथ अवताडे यांनी ३ वर्षांपासून ही कंपनी चालू केली होती. त्यांनी श्रीगोंदा, पारनेर, कर्जत, शिरुर, दौंड तालुक्यात भरपूर कमिशन देऊ केल्याने पतसंस्थाचे कर्मचारी, अधिकारी बँकेचे अधिकारी एजंट म्हणून सामील झाल्याने सर्वसामान्य जनता तिकडे आकर्षित झाली.

विशेष म्हणजे दरमहा व्याजपरतावा ११ टक्के ते १५ टक्क्यांपर्यंत देणार अशी शाश्वती दिल्याने गुंतवणूकदारांनी पतसंस्था, बँकेतील ठेवी काढुन ह्या फसव्या सिस्पे कंपनी त गुंतवल्या, काही काळ सांगितल्याप्रमाणे भरपूर असा व्याज परतावा मिळाला, कमिशन एजंटला ही भरपूर कमिशन मिळाले. काही दिवसांनी सिस्पे ह्या कंपनीने नावात बदल केला आणि सिस्पे इन्फानाईट नावाने श्रीगोंदा, पारनेर तालुक्यात मल्टीनिधी संस्था सुरु केल्या. त्यामुळे गुंतवणूकदारांना विश्वास पटला. नंतर काही दिवसांनी कंपनीने व्याजदर कमी करुन ६ टक्के ते ८ टक्के वर आणला. अनेकांनी तरी अनेकांनी पतसंस्था, बँकेतील ठेवी काढुन दरमहा ८ टक्के परतावा व्याज मिळते. या अमिषाला बळी पडून ठेवीदारांना ठेवी ठेवल्या.

**५ महिन्यापूर्वी दैनिक अक्षराज या दैनिकाने सर्व ठेवीदारांना अगोदरच सावध केल्याने नविन ठेवीदार या बनावट सिस्पे कंपनीतून वाचला. हे पारनेर, श्रीगोंदा, शिरुर, नगर तालुक्यातील ठेविदारांचे भाग्यच...**

सदर कंपनीत पतसंस्था, बँकाचेच पदाधिकारी हेच ह्या बनावट कंपनीचे एजंट झाले. सर्वसामान्य जनता यांच्याकडे आकर्षित होऊन गुंतवणुका झाल्या. याचा मुख्य केंद्रबिंदु पारनेर तालुक्यातील सुपा असून जास्त गुंतवणूक ही सुपा पंचक्रोशील गावांची झाल्याचे चित्र दिसते. कारण सुपा औद्योगिक वसाहतीमधे सर्व सामान्य शेतकरी वर्गाला जमिनीचे लाखावर, कोटीवर रुपये मिळाल्याने बनावट सिस्पे कंपनीचा केंद्रबिंदु मानून गेला. गुंतवणूक दारांमधे शेतकरी वर्ग,बँक कर्मचारी, शिक्षक, इन्वस्टर उद्योगपती राजकारणी यांचा समावेश आढळून येतो.

# चक्क आमदारालाच खंडणी मागणारा कथीत कामगार नेता पोलिसांच्या जाळ्यात

## माढ्याचे आमदार पाटील यांच्याकडे केली १ कोटी रू. खंडणीची मागणी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.११, पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा राजवाडा अशी ओळख असलेल्या विठ्ठल सह.साखर कारखान्याचे कामगारांना थकित देणी मिळवून देण्यासाठी आंदोलन करणारे अनवली येथील कथीत कामगार नेत्याने चक्क या कारखान्याचे चेअरमन आणि शरदचंद्र पवार पक्षाचे माढा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनाच कारखान्याची बदनामी थांबविण्यासाठी १ कोटी रुपयांची खंडणी मागितल्याने खळबळ उडाली असून यामधील १० लाख रुपये स्वीकारताना संबंधित कामगार नेता पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे. किरण राज घोडके असे खंडणी मागणाऱ्याचे नाव आहे. त्याच्यावर पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या विरोधात किरण राज घोडके हे गेल्या काही दिवसापासून आंदोलने करीत होते. कारखान्याची बदनामी थांबवण्यासाठी त्याने १ कोटी रुपयांची मागणी केली होती. १० लाख रुपये घेताना त्याला खंडणी विरोधी पथकाने सापळा रचून पकडले.



मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसापूर्वी पुण्यात साखर आयुक्तालयासमोर कारखान्याचे कामगार आणि काही व्यापाऱ्यांना घेऊन घोडके याने आंदोलन केले होते. त्यानंतर आमदार अभिजीत पाटील यांचे स्वीय सहाय्यक नितीन सरडे यांनी घोडके याच्याकडे या आंदोलनाबाबत विचारणा केली. त्यावर कारखान्याची बदनामी थांबवायची असेल तर एक कोटी रुपये द्या, अशी मागणी घोडके याने केली. आमदार अभिजीत पाटील यांनी याबाबत पंढरपूर पोलिसात तक्रार देण्यास सरडे यांना सांगितले होते. त्यानुसार सरडे यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात घोडके यांच्या विरोधात तक्रार दाखल केली होती. सरडे यांनी गुरुवार, दिनांक १० जुलै २०२५ रोजी रात्री घोडके यांना फोन केला.

एका हॉटेलमध्ये ही रक्कम घेण्यासाठी बोलवले. त्यापूर्वी सरडे यांनी दहा लाख रुपयांच्या नोटा पोलीस आणि पंच यांना दाखविल्या. त्यानंतर पोलिसांनी दोन पंच यांना घेऊन या हॉटेल परिसरात सापळा रचला. रात्री साडेआठच्या दरम्यान घोडके पैसे नेण्यासाठी आला पोलिसांनी घोडके याला १० लाखाच्या रकमेसह ताब्यात घेतले. त्याच्यावर गुन्हा दाखल करुन अटक केली आहे. मागील काही दिवसापूर्वी पंढरपूर तालुक्यात कामगार नेता म्हणून वावरणारा घोडके याने कामगारांना विश्वासात घेत कारखान्यात भ्रष्टाचार झाला आहे. कामगारांचे पगार थकले आहेत. मी तुमचे सगळे पैसे मिळवून देतो असे सांगत त्याने संबंध नाराज कामगारांना संघटित केले. कामगारांच्या थकित पगारासाठी पुणे येथील साखर आयुक्त कार्यालयासमोर सेवानिवृत्त कर्मचारी कामगारासह उपोषणही केले. त्यावेळी त्याने अचानक सुरू उपोषण बंद केले होते. त्याच्या या आंदोलनामुळे आमदार अभिजीत पाटील यांच्या ताब्यात असलेल्या श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची थकित पगारामुळे नाहक मोठी बदनामी होत होती.




२ वर्ष बंद पडलेला व शेतकरी सभासदांची देणे थकलेला श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना सत्ताधारी यांच्याकडून कारखान्याच्या निवडणुकीत आ.अभिजीत पाटील यांनी आपल्या ताब्यात घेत एक हाती सत्ता मिळवली तो चांगल्या पद्धतीने चालवून दाखवला व सर्व सभासद ऊस बिले, ट्रॅक्टर मालक सेवानिवृत्त कामगार यांची सर्व थकीत देणे देऊन कारखाना सद्यस्थितीत चांगल्या प्रकारे चालत असताना श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यास डाग लावण्याचे काम काही मंडळी आतून करत असल्याचे सर्वसामान्य सभासदांमधून बोलले जात आहे.

पेशाने वकील असणाऱ्या घोडके यानी आपल्या विश्वासू कार्यकर्त्यामार्फत आमदार अभिजीत पाटील यांच्या कार्यकर्त्याकडे काही अटी पोहच केल्या. संबंधित घोडके यांच्या कार्यकर्त्यांनी हा निरोप व्यवस्थित आमदार पाटील यांच्या कार्यकर्त्याकडे पोहोचवल्यानंतर देव – घेवचे आर्थिक बोलणे झाले. त्यातील काही रक्कम टोकन म्हणून घोडके यांना देण्याचे ठरले गुरुवार रोजी सायंकाळी आठच्या दरम्यान आमदार पाटील याचे कार्यकर्ते व किरण घोडके हे पंढरपुरातील नामांकित असणाऱ्या के.बी.पी चौकात १० लाखाची रक्कम देण्यासाठी हॉटेलमध्ये बसले होते. यावेळी अँड.किरण घोडके यांना दहा लाखाची रक्कम ठरल्याप्रमाणे सुपूर्त करण्यात आली. परंतु घड्याळाचे काटे उलटे फिरले सेवानिवृत्त कामगारांच्या डोळ्यात धूळ फेक करून कामगारांच्या जीवावर नेता होण्यासाठी गेलेल्या घोडके याला १० लाखाची खंडणी स्वीकारताना लाचलुचपत विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडून गजाआड केले.

# थोडक्यात

## जिल्हा परिषद शिक्षकाचा मुलगा बनला शास्त्रज्ञ



**अक्षराज : राजेश पुरी**

**दि.१०, कळंब (धाराशिव) :** कळंब तालुक्यातील शेलगाव येथे प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत असणारे ज्ञानेश्वर गोपीनाथ सुरवसे यांचा मुलगा विवेक यांची भारत सरकारच्या न्यूक्लियर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड या ठिकाणी शास्त्रज्ञ म्हणून निवड झाली असून त्यांचे नियुक्ती पत्र नुकतेच प्राप्त झाला आहे. त्यांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. विवेक चे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत झाले आहे. तर माध्यमिक शिक्षण जनता विद्यालय मुरुड येथे झाले आहे. सुरूवातीपासूनच अभ्यासात कायम अग्रस्थानी असणाऱ्या विवेकने दहावीत १०० टक्के गुण घेऊन आपली भविष्यातील दिशा दाखवून दिली होती. आणि तेव्हा पासूनच शास्त्रज्ञ होण्याचे त्यांचे स्वप्न होते. लातूर येथील नामांकित राजर्षी शाहू महाविद्यालयातून आयआयटी जेईई तयारी करून भारतातील अव्वल असणाऱ्या आयआयटी मद्रास (चेन्नई) तामिळनाडू येथून इ. ढशलह. (इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग) प्रथम श्रेणीत पुर्ण केले. ऋअढए परीक्षा २०२५ यशस्वी होवून या द्वारे वैज्ञानिक क्षेत्रात पदार्पण केले. विवेकने लहानपणापासून बाळगलेल स्वप्न साकार होत असताना या पर्यंतच्या प्रवासात वडिलांबरोबर आईचे कष्ट अधिक मोलाचे ठरले आहे. त्यामुळे विवेकचे वडील विवेकच्या यशाचे श्रेय त्याच्या आईला व मार्गदर्शक सर्व शिक्षक यांना देतात. विवेकच्या या यशाबद्दल सर्व संबंधित शिक्षक, तसेच नेहमी मार्गदर्शन करणारे धर्मराज काळमाते, गटशिक्षणाधिकारी कळंब व विविध अधिकारी आणि सर्व स्तरातून कौतुक होत आहे. सामान्य शिक्षकाच्या मुलाने मिळवलेले यश आदर्शवत असून त्याबद्दल विवेक बरोबर त्याच्या आई वडिलाचे देखिल सर्वत्र अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

## गुन्हे तक्रार व गुप्तचर परिषदेच्या सदस्य पदी डॉ.निलेश राणे यांची नियुक्ती



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, मुंबई :** डॉ.निलेश राणे यांची दिल्ली येथून गुन्हे तक्रार व गुप्तचर परिषदेच्या सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ.निलेश राणे यांच्या १४ वर्षांपासून करत असलेल्या कार्याच्या आधारे त्यांची राष्ट्रीय स्तरावरील गुप्तचर परिषदेच्या पदी नियुक्ती करण्यात आली, तसेच राज्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासंदर्भात देखील डॉ.निलेश राणे हे अतिशय मोलाचे योगदान देत आहेत. गुन्हे तक्रार व गुप्तचर परिषद ही गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराशी लढण्यासाठी, मानवी हक्कांसाठी वकिली करण्यासाठी तसेच अनेक कार्य या परिषदेमार्फत होत आहे. ही निवड झाल्याबद्दल डॉ.निलेश राणे यांना राज्यभरातून राजकीय, क्रीडा, शिक्षण, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## रामकृष्ण परमहंस परिवाराचा गुरुपोर्णिमा उत्सव आनंदात संपन्न



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१०, केज (बीड) :** केज येथील प.पू.वै.वासुदेव खंदारे गुरुजींच्या कृपाशिर्वादाने चालत आलेला गुरुपोर्णिमा उत्सव यावर्षी देखील विठाई मंगल कार्यालय केज येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी खंदारे गुरुजींच्या वृंदावन धाम या निवासस्थानी ठाकुर रामकृष्ण परमहंस, शारदा माता व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. व नंतर वृंदावन धाम येथून प.पू.वै. खंदारे गुरुजींच्या पादुका पालखी मध्ये ठेवून विठाई मंगल कार्यालया पर्यंत पायी दिंडी काढण्यात आली. कार्यक्रमस्थळी खंदारे गुरुजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून गुरुमाई खंदारे आईंची पाद्य पुजा करण्यात आली. यावेळी जेष्ठ गुरुबंधु समाधान महाराज शर्मा यांनी गुरुजींनी सर्व साधकांना दिलेली ध्यान प्राणायाम साधना याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच ध्यान प्राणायाम साधनेने जीवनात कसे अमुलाग्र बदल होतात हे सांगितले व गुरुजींच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच यावेळी प्राचार्य विवेक मिरगणे, दिपाताई काटे व उत्रेश्वर जाधव यांनी गुरुजींनी दिलेल्या ध्यान साधने विषयी अनुभव कथन केले. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रातील खंदारे गुरुजींचे शिष्य मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सर्व शिष्य साधकांना खंदारे गुरुजींनी दिलेली ध्यान साधना रोज न चुकता करावी. यासाठी शर्मा महाराजांनी शपथ दिली.या कार्यक्रमात दिंडीत सहभागी साधकांचा रिंगण सोहळा पार पडला. सर्व ध्यान प्राणायाम साधकांनी गुरुस्मरण करून गुरुपोर्णिमा सोहळा संपन्न झाला.

## के.रामलू शाळेतील तीन विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.११, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथील के.रामलू शाळेची यशाची परंपरा कायम ठेवत इयत्ता ८ वी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ३ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले असून या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदे मार्फत घेण्यात आलेल्या पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८वी परीक्षेचा निकाल लागला आहे. या परीक्षेमध्ये कुंडलवाडी शहरातील के रामलू शाळेतील यश व्यंकटराव भांगे, श्रीजा प्रमोद पाठक, श्रेया पिराजी जजगेकर या तीन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र होत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षकवृंद व पालकवर्गातून सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक अभिनंदन होत आहे.

# थोडक्यात

## गरजू होतकरू विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, मुंबई :** दिनांक ०५ जुलै २०२५ रोजी मानखुर्द येथे संकल्प संस्था आणि आरिन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच संकल्प संस्थाचे अध्यक्ष विनोद हिवाळे यांच्या पुढाकाराने आरीन फाऊंडेशनचे अध्यक्ष नितेश मिसाळ यांच्या माध्यमातून एम/पूर्व मानखुर्द विभागातील गरजू होतकरू विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप करण्यात आले. संकल्प संस्था गेली १२ वर्षापासून चेंबूर गोवंडी शिवाजी नगर मानखुर्द या एम/पूर्व विभागात वस्ती विकास प्रकल्प अंतर्गत शैक्षणिक आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि वस्ती संघटन या विषयावर कार्य करीत आहे.

त्याचाच महत्वाचा एक भाग म्हणून संकल्प संस्था दर वर्षीप्रमाणे आरिन फाउंडेशन यांच्या मदतीने यावर्षी या दोन्ही संस्थेच्या माध्यमातून गरजवंत कुटुंबातील गरजू विद्यार्थ्यांना स्कूल बॅग चे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे संकल्प संस्था मधून सविता हेंडवे आणि आरिन फाउंडेशन कडून किरण जाधव यांनी समन्वयक म्हणून कामकाज पाहिले. वनिता सावंत यांनी वस्ती पातळीवर असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कुटुंबातील मुलांबरोबर नियोजनबद्ध कार्यक्रमाची आखणी केली. संकल्प संस्थेचे अध्यक्ष विनोद हिवाळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शैक्षणिक विषयावर मोलाचे मार्गदर्शन आणि भविष्यासाठी होणाऱ्या कार्यक्रमाबद्दल चर्चा केली. तसेच संकल्प संस्थेच्या सचिव सविता हेंडवे यांनी एम पूर्व विभागा मधील वस्ती विकास प्रकल्प अंतर्गत वस्तीमध्ये होणार्या होणाऱ्या कार्यक्रमाची माहिती दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संकल्प संस्थेचे दीपा गमरे, प्रतिभा सुतार, उमा चंदनशिवे यांचे विशेष सहकार्य लाभले.

## टाकळीढोकेश्वर ग्राम दक्षता समितीच्या अध्यक्षपदी नारायण झावरे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामपंचायत पातळीवर सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत रेशन दुकानातून वितरित करण्यात येणाऱ्या जीवनावश्यक वस्तूवर देखरेख ठेवण्यासाठी अध्यक्ष, सचिव अशा अशासकीय पद असलेल्या दक्षता समिती स्थापन करण्यात आली. समितीमध्ये विविध कार्यकारी सोसायटी, तीन महिला प्रतिनिधी, विरोधी पक्षाचा सदस्य, अनुसूचित जाती प्रतिनिधी, अनुसूचित जमाती प्रतिनिधी व एक सामाजिक कार्यकर्ता इत्यादींचा नुकताच समावेश आहे. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल स्वस्त धान्य दुकान ग्राम दक्षता समितीच्या अध्यक्षपदी टाकळी ढोकेश्वर येथिल विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन नारायण यशवंत झावरे तसेच गंगाधर रखमाजी बांडे यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड झाली आहे. सचिवपदी ग्राम महसूल अधिकारी व्हि.एन.जाधव यांची निवड झाली. या समितीमध्ये सदस्य म्हणून टाकळी ढोकेश्वर ग्रामपंचायतच्या सरपंच अरुणा प्रदीप खिलारी, ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शिवाजी सिताराम खिलारी, पत्रकार वसंत भानुदास रांधवण, सामाजिक कार्यकर्ते संजय शिवाजी झावरे, महिला प्रतिनिधी,माजी ग्रामपंचायत सदस्या चित्रा संतोष बांडे, ग्रामपंचायत सदस्या सुग्राबी कादर हवालदार, अनुसूचित मागासवर्गीय प्रतिनिधी म्हणून शिला आनंदा आल्हाट, स्वस्त धान्य दुकानाचे सेल्समन विलास गुलाब नाईकवाडी यांची सेवा सोसायटीच्या वतीने ग्रामसभेत बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

## कलाशिक्षक संतोष क्षिरसागर यांनी रेखाटले मातीच्या विटेवर पांडुरंग



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** सध्या आषाढीनिमित्त केवळ पंढरीच नाहीतर संपूर्ण महाराष्ट्र सज्ज झाला आहे. आषाढी एकादशीला पांडुरंगाच्या चरणी प्रत्येकालाच माथा टेकवण्याचा योग येत नाही.

पण प्रत्येक व्यक्ती या ना त्या मार्गाने पांडुरंगाची सेवा मात्र नक्की करतो. पारनेर तालुक्यातील वासुंदे येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाचे कलाशिक्षक संतोष पांडुरंग क्षीरसागर त्यापैकीच एक, त्यांनी कुंचल्यातून त्यांची भक्ती सादर केली आहे. मातीच्या बांधकामाच्या विटेवर संतोष क्षिरसागर यांनी त्यांच्या मनातले पांडुरंग रेखाटले आहेत. ज्याची आपण आतुरतेने वाट पाहत होतो.तेच आपले स्वप्न पूर्ण होत आहे. बरेच जण पंढरपूर पायी चालत दिंडीला जाऊन हा ऐतिहासिक सोहळा याची देही याची डोळा बघतीलही परंतु सगळ्यांनाच शक्य होईल असे नाही. म्हणून इथेच शाळेत राहून आपल्या कलेच्या माध्यमातून त्यांनी पांडुरंगाला साक्षात पाहिलं नसलं तरी या विटेवरचे पांडुरंगच त्यांना भेटलेले आहेत. सुंदर लिखाणाद्वारे तसेच उत्कृष्ट चित्रकलेद्वारे क्षिरसागर हे परिसरातील गावोगावी परिचित झाले असून त्यांच्या या चित्रकला, हस्ताक्षर रेखाटन कलेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दरम्यान, संतोष क्षिरसागर यांनी आपल्या अंगी असलेली कला जोपासत नेहमीच सामाजिक, वैचारिक विषयांनाही अतिशय महत्व दिले आहे. कलेच्या माध्यमातून क्षिरसागर हे समाज सेवा करत आहेत. नारायण महाराज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली क्षिरसागर यांनी अडीच वर्षे लिखाण करून ज्ञानेश्वरी ग्रंथ हस्तलिखित लिहिला आहे. संतोष क्षिरसागर यांनी आजवर बऱ्याच प्रकारच्या पेंटिंग केल्या आहेत. पिंपळाच्या पानावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा, आंब्याच्या पानावर, रुईच्या पानावर हनुमानाच अश्या बऱ्याच झाडांच्या पानांवर त्यांनी पेंटिंग केले आहेत.त्याच सोबत क्षिरसागर यांनी आपल्या हस्तकौशल्याच्या माध्यामातून अनेक कलाकृती तयार केल्या आहेत. कलेची आवड असल्यामुळे नेहमीच काही तरी नवीन करण्याची उर्मी त्यांच्यामध्ये असते. भाऊसाहेब महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, वासुंदे गावचे सरपंच झावरे, माजी उपसरपंच शंकर बर्वे व सर्व शिक्षक वृंद यांनी क्षिरसागर यांचे विशेष कौतुक केले आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व व्यसंगी व बहुआयामी होते - सरन्यायाधीश गवई

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०५, मुंबई :** विविध विषयांचे अभ्यासक व तज्ञ असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व विधीतज्ञ, अर्थतज्ञ, समाजशास्त्रज्ञ असे बहुआयामी होते. शिक्षण क्षेत्रातील बहुमोल योगदानाबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अध्यापन कारकीर्दही मोलाची आणि प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.शासकीय विधी महाविद्यालय येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्राध्यापक आणि प्राचार्य, कारकीर्दीला ९० वर्षे पूर्ण झाल्या निमित्त स्मृतीपटलाचे अनावरण आणि सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती मनिष पितळे, महाधिवक्ता बिरेंद्र सराफ व प्राचार्या डॉ.अस्मिता वैद्य हे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर व जीवनावर आधारित चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. शासकीय विधी महाविद्यालयाच्या वतीने मानपत्र देऊन सरन्यायाधीश भूषण गवई यांचा गौरव करण्यात आला. विविध संस्था तसेच मान्यवरांनीही यावेळी सरन्यायाधीश गवई यांचा गौरव केला.सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व



व्यासंगी व बहुआयामी होते. ते एक उत्कृष्ट शिक्षक असल्याने त्यांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबरोबरच त्यांची अध्यापन कारकीर्दही प्रेरणादायी ठरले. शासकीय विधी महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करीत असतानाच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील दुर्बल घटकांवरील अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य सुरू केले.१९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया या ॲक्टमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान मोलाचे ठरले.

शासकीय विधी महाविद्यालयाला देदीप्यमान शैक्षणिक वारसा लाभला असून अनेक विधीज्ञ या महाविद्यालयातून घडले. महाविद्यालयाच्या विविध समित्यांचे वैशिष्ट्यपूर्ण कार्यही अभिनंदनीय आणि अनुकरणीय असल्याचे गौरवोद्गार श्री गवई यांनी काढले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य केले त्या ठिकाणी गौरव होणे व शासकीय विधी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असल्याचा सार्थ अभिमानाचे असल्याचेही श्री गवई यांनी नमूद केले. प्राचार्य अस्मिता वैद्य प्रास्ताविकात म्हणाल्या, शासकीय विधी महाविद्यालयाला देदीप्यमान शैक्षणिक वारसा लाभला असून अनेक नामवंत विधीज्ञ या महाविद्यालयाने घडविले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून १९३५ मध्ये अध्यापन कारकीर्दीस सुरुवात केली. न्यायशास्त्रासारख्या अत्यंत गहन विषयाचे अध्यापन डॉ आंबेडकर करीत असत. या महान कार्याला ९० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या गौरवार्थ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विधी सेवा क्षेत्रात महाविद्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचेही वैद्य यांनी सांगितले.या कार्यक्रमास सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती हेमंत गोखले, न्यायाधीश रेवती ढेरे, न्यायाधीश नीला गोखले, कुलगुरू डॉ. दिलीप उके, कुलगुरू डॉ.हेमलता बागला, कुलगुरू डॉ.अपूर्वा पालकर, कुलगुरू डॉ.गोसावी, प्रधान सचिव सुवर्ण केवले, सिनियर कौन्सेल रफिक दादा, बार कौन्सिल अध्यक्ष विठ्ठल कोंडे-देशमुख, प्रिन्सेस आशाराणी गायकवाड व मान्यवर उपस्थित होते.

## मराठी भाषा कृतीपुस्तिका निर्मितीसाठी नागपूर जिल्ह्यातील ९ शिक्षकरत्नांची निवड



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०६, नागपूर :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० नुसार नव्या अभ्यासक्रमावर आधारित इयत्ता पहिली ते पाचवीच्या मराठी भाषेतील कृतीपुस्तिका (आर- १ व आर -२) निर्मितीसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्यापरिषद), पुणे यांच्यावतीने विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या महत्वाच्या कार्यशाळेसाठी राज्यभरातून गुणवंत व प्रेरणादायी कार्य करणाऱ्या शिक्षकांची निवड करण्यात आली असून नागपूर जिल्ह्यातून एकूण नऊ शिक्षकांचा समावेश करण्यात आला होता.

या कार्यशाळेत नागपूर जिल्ह्यातून तंत्रस्नेही शिक्षक ओंकार पाटील, शिक्षण अभ्यासक राजेंद्र टेकाडे, आदर्श विज्ञान शिक्षिका वसुंधरा धोटे, आदर्श मुख्याध्यापिका मिरा मुसळे, आदर्श शिक्षिका सपना मानकर, तंत्रस्नेही शिक्षिका सरीता वागदे, साधनव्यक्ती देवराव पेलने, उपक्रमशील शिक्षिका पौर्णिमा पडधान व तंत्रस्नेही शिक्षक चंद्रकांत रोकडे यांची निवड करण्यात आली होती. या शिक्षकांनी कार्यशाळेत सहभागी होत मराठी भाषेच्या कृतीपुस्तिकेच्या निर्मितीत सक्रिय सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांसाठी अनुभवाधारित, आनंददायी, कृतीयुक्त, ज्ञानरचनावादी आणि सुलभ शिक्षण उपलब्ध व्हावे. यासाठी शिक्षण तज्ज्ञ, विद्यापरिषद अधिकारी आणि नामवंत शिक्षक यांच्यासोबत ही कृतीपुस्तिका विकसित केली जात आहे. या प्रक्रियेत विद्यापरिषदेचे संचालक राहुल रेखावार (आय ए एस) आणि भाषा विभागाचे प्रमुख डॉ.ज्ञानेश्वर नागरे यांचे सक्रिय मार्गदर्शन लाभले.

महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेले शिक्षक ज्ञाननिर्मितीच्या या प्रवासात सहभागी होत एक सर्जनशील अध्यापन साचा उभा करीत आहेत. सीबीएसई पॅटर्नच्या नव्या अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीसाठी ही कृतीपुस्तिका विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, भाषिक आणि भावनिक विकासासाठी उपयुक्त ठरणार आहे. नागपूर जिल्ह्यातील शिक्षकांची निवड ही गौरवाची बाब असून त्यांचे कार्य सर्व शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

## थकीत देयकांच्या मागणीसाठी धाराशिव कंत्राटदार संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन




**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०६, धाराशिव :** राज्यातील सर्व विभागाकडील ओपन कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता, हॉट मिक्स धारक कंत्राटदार, मजुर संस्था आणि विकासक यांची विविध विभागाकडील ८९ हजार कोटींची देयके रखडली आहेत. ही देयके तातडीने देण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्याकडे धाराशिव कंत्राटदार संघटनेच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. धाराशिव कंत्राटदार संघटनेच्या वतीने शुक्रवारी मागणीचे निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले की, कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजुर संस्था, विकासक हे राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग, नगरविकास, जलसंधारण व जलसंपदा विभाग, जलजीवन मिशन, सारखे अनेक विभागाकडील शासनाची विकासांची कामे करीत आहेत, परंतु गेल्या आठ-दहा महिन्यांपासून सदर शासनाची विकासांची कामे केलेल्या वर्गाची देयके शासन दरबारी मिळत नाहीत. सर्व विभागाकडील एकुण ८९ हजार कोटी रूपये एवढ्या मोठ्या रकमेची देयके प्रलंबित आहेत. यासाठी गेल्या वर्षाभरापासुन राज्यातील सर्व विभागाकडील विकासाची कामे केलेल्या सदर वर्गाने धरणे आंदोलन, आमरण उपोषण, मोर्चा, मंत्रीमहोदय, अधिकारी यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करुन निवेदन देऊन लोकशाहीस अभिप्रेत असलेल्या अनेक मार्गाने सर्व महाराष्ट्र भर सातत्याने प्रयत्न करीत आहेत.

### ..अन्यथा तीव्र आंदोलन करणार - साळुंके

विकासकामांची देयके मिळावी यासाठी कंत्राटदार संघटनेच्या वतीने आम्ही वेळोवेळी आंदोलने करून, निवेदने दिली. परंतु सरकारने दखल घेतली नाही. त्यामुळे सरकारने आधीची देयके तातडीने द्यावीत. तोपर्यंत नवीन कामे काढू नये. देयके अदा न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल. याची सरकारने दखल घ्यावी.

**सज्ञनराव साळुंके (अध्यक्ष, धाराशिव कंत्राटदार संघटना)**

आजतागायत शासन व प्रशासन फक्त एवढे मोठी घटना असुनही सदर गंभीर विषयाकडे कायम दुर्लक्ष करीत आहे. हे महाराष्ट्र शासनाच्या उज्वल परंपरा व नावलौकिकास शोभत नाही. तसेच वारंवार मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व इतर संबंधित मंत्री व इतर प्रशासकीय स्तरावर निवेदन देऊनही या गंभीर विषयावर संघटनेच्या शिष्टमंडळाबरोबर चर्चा करण्यासाठी वरील सर्व मान्यवरांनी बैठकीस वेळ दिला नाही.

तरी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात सदर निवेदन संघटनांच्या वतीने सादर करण्यात आले आहे. याबाबत तातडीने, शासन, राज्यकर्ते व प्रशासनाने मार्ग काढावा अन्यथा शेती नंतरचा सगळ्यात मोठा व्यवसाय व या व्यवसायावर अवलंबून असलेले करोडो घटकांचे कुटुंब व त्यांचा चरितार्थ हे आर्थिक अडचणी तर येतील. पर्यायाने राज्याची सर्व जनताभिमुख विकासाची कामे या चक्रव्यूहात अडकून बसतील. तरी शासनाने मागणीची दखल घेऊन तातडीने देयके अदा करावीत, असे निवेदनात नमूद केले आहे.

निवेदनावर धाराशिव कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष सज्जणराव साळुंके, सचिव के.डी.घोडके, संदीप पवार, डी.बी.शिंदे, बालाजी कंट्रकशन, व्ही.बी.मोटे इन्फ्रा, संदीप ठोंबरे, एन.एम.शिंदे, ए.जी.गरड, अनुज कुडाळ, मे.डी.सी.अजमेरा, के.एफ. पठाण, रमिज तांबोळी, पृथ्वीराज देडे, ए.डी.कोकाटे, सागर कंट्रकशन, नागनाथ कंट्रकशन आदींची स्वाक्षरी आहे.

## आषाढी एकादशीला खापरखेडा-भानेगाव परिसरात अवतरली पंढरी

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०६, नागपूर :** नाम विठ्ठलाचे घेऊ, सारे वाळवंटी जावू दिंडी आली दारावरी, चला पंढरीला जाऊ या विठ्ठलाच्या भजनाचे नामस्मरण करून दिंडी यात्रेत टाळ मृदंगाच्या तालावर नाचत गाजत खापरखेडा परिसरातील शेकडो वारकरी बंधू भगिनी एकत्र येत दिनांक ०६ जुलै २०२५ रोजी देवशयनी आषाढी एकादशी मोठ्या विविध धार्मिक कार्यक्रमांतर्गत उत्साहात साजरी केली. याप्रसंगी दिंडी यात्रेत परिसरातील वारकऱ्यांचे भजन मंडळ व दिंड्या सामील झाल्या होत्या. त्यामूळे खापरखेडा परिसरात जणू पंढरी अवतरल्याचे जाणवत



होते. देवशयनी आषाढी एकादशीचे औचित्य साधून दरवर्षी प्रमाणे यंदाही वारकरी बांधवांच्या वतीने दिंडी यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. दिंडी यात्रेत परिसरातील भजनमंडळ व दिंड्या सहभागी झाल्या होत्या. वारकरी टाळ मृदंगाच्या तालावर नाचत गाजत विठू माझा लेकुरवाळा, पाऊले चालती पंढरीची वाट, विठू माहुली तू माहुली जगाची, विठ्ठल आवडी प्रेमभावे, विठ्ठलाच्या पायी वीट झाली भाग्यवंत अशी एकापेक्षा एक सरस भजने म्हणून वारकरी बंधू भगिनींनी परिसर दणाणून सोडला होता. हनुमान मंदिर रेल्वे चौकी वार्ड क्रमांक १, राम मंदिर प्रकाश नगर वसाहत, नविन बिना हनुमान मंदिर, उपासे ले आउट, शिक्षक कॉलनी, साई मंदिर व हनुमान मंदिर भानेगाव, जय दुर्गा मंदिर नविन बिना,हनुमान मंदिर छत्रपती संभाजी महाराज उद्यान आदी परिसरात दिंडी यात्रेचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी वारकरी बांधवांनी रिंगण तयार करून विठ्ठल नामाचे स्मरण केले.

# विकास कामे खऱ्या अर्थाने जनतेने करून घेतली पाहिजे - महसूल मंत्री बावनकुळे

## चनकापूर पोटा येथे ७ कोटी ३४ लाख रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** आमदार, खासदार, पालकमंत्री विकास कामांसाठी निधी देत असतात. मात्र खऱ्या अर्थाने आपल्या घरा समोरील विकास कामे जनतेने उभे राहून करून घेतली पाहिजे. तरच उत्तम दर्जाची विकास कामे होतील अन्यथा अर्धे तुम्ही अर्धे आम्ही, रोजगार हमी झाल्या शिवाय राहणार नाही असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. दिनांक ०५ जुलै २०२५ रोजी पोटा (चनकापूर) येथे प्रधानमंत्री ग्रामीण खनिज कल्याण निधी अंतर्गत मंजूर झालेल्या ७ कोटी ३४ लाख रुपयांच्या विविध विकास कामांच्या भूमीपूजनाला आले असतांना बोलत होते.

मंचावर खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार डॉ. आशिष देशमुख, डॉ. राजीव पोतदार, जिल्हाध्यक्ष म नोहर कुंभारे, रामराव मोवाडे, उपविभागीय अधिकारी संपत खलाटे, सामाजिक कार्यकर्ते शांताराम गावंडे, रीपाचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज बोरकर, माजी जि. प. सदस्य प्रकाश खापरे, निलिमा उईके, खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे अभियंता गिरीश कुमारवार, भानेगाव सरपंच शालिनी चवरे, पोटा (चनकापूर) ग्रामपंचायतचे सरपंच पवन धुर्वे, उपसरपंच विश्वजित सिंह, प्रमोद पिंपळे, अशोक तांदूळकर, किशोर मुसळे, विलास महल्ले, रुपेश सावरकर, सिद्धार्थ म नेराव, राजेंद्र इंगोले आदि उपस्थित होते.

गौण खनिज निधी अंतर्गत मिलनचौक ते रोहना सिमेंट रस्ता व पोटा चनकापूर वार्ड क्रमांक १ ते ५ मध्ये विविध विकास कामे करण्यात येणार आहेत. यावेळी परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन गणेश गायकवाड, आभार नितीन गोस्वामी यांनी मानले.

प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजने अंतर्गत पोटा (चनकापूर) ग्रामपंचायत हद्दीत ७ लाख ३४ लाख रुपयांची विकासकामे १८ एप्रिल २०२२ रोजी मंजूर करण्यात आली होती. मात्र, राजकारण आडवं



आल सरकार बदलले विकास कामांवर स्थगिती देण्यात आली. गौण खनिज निधीतून मंजूर कामे त्वरित सुरू करण्यासाठी माजी जि.प.सदस्य प्रकाश खापरे व माजी पंचायत समिती उपसभापती राहुल तिवारी यांनी आमरण उपोषण केले मात्र विकास कामे सुरू झाली नाही. तब्बल ३ वर्षाच्या प्रतीक्षेनंतर भूमिपूजन झाले.

# कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेड विरोधात बल्लारपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

## शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आ.मुनगंटीवार यांची कायदेशीर लढ्याची ठाम भूमिका



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, बल्लारपूर (चंद्रपूर) :** शेतकऱ्यांना रासायनिक खत देताना जबरदस्तीने इतर उत्पादने खरेदीस भाग पाडणाऱ्या कोरोमंडल इंटरनॅशनल लिमि टेड या कंपनी विरोधात शनिवार, दिनांक ०५ जुलै २०२५ रोजी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी हे पाऊल उचलण्यात आले असून, या प्रकरणी तातडीने कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

शेतकऱ्यांना खताचा पुरवठा करण्यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या कृषी अधिकारी यांनी खताचे वाटप आणि वितरण कसे करावे, याबाबत कोरोमंडल कंपनीला स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. त्यानंतरही कोरोमंडल शेतकऱ्यांना अनावश्यक उत्पादने घेण्यास जबरदस्ती करीत आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी कोरोमंडल कंपनीला दोन नोटीस दिल्या. लिंकिंगचा हट्ट धरू नये, असे सुचवले. त्यानंतर ही कंपनी शेतकऱ्यांना डीएपीची खरेदी करताना सल्फर, पीडीएम पोटॅश आणि १५:१५:१५ खते जबरदस्तीने घ्यायला लावत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होत असल्याचे आ. मुनगंटीवार म्हणाले.

ते पुढे म्हणाले, या संदर्भात मी कृषी विभागाचे सचिव विकास रस्तोगी यांची वैयक्तिकरित्या भेट घेतली आणि चंद्रपूर जिल्ह्यात अशा प्रकारचे शेतकऱ्यांविरोधातील अन्यायकारक प्रकार होऊ नयेत, याबाबत त्यांचे लक्ष वेधले. 'जगाच्या पोशिंद्यांवर असा अन्याय होतो आहे,' हे त्यांच्यासमोर स्पष्टपणे मांडले. तसेच, कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेडचे विक्री व विपणन उपप्रबंधक प्रितम सिंह यांच्याशीही मी संवाद साधला. त्यांना विनंती केली की, शेतकऱ्यांवर जबरदस्ती थोपवू नका आणि झालेल्या चुका तात्काळ दुरुस्त करा.

कोरोमंडल लिमिटेड आणि कंपनीचे विक्री व विपणन उपप्रबंधक प्रितम सिंह यांच्या विरुद्ध तक्रार देताना भाजपचे स्थानिक नेते, कार्यकर्ते तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जीवनावश्यक वस्तू प्रतिबंधक अधिनियम ांतर्गत योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशीही आ.सुधीर मुनगंटीवार यांनी मागणी केली आहे. शेतकऱ्यांचे शोषण थांबले नाही, तर यापुढे आंदोलनात्मक मार्गही अवलंबण्यात येईल, असा इशारा ही आ.मुनगंटीवार यांनी यावेळी दिला.

**कायदेशीर लढा उभारण्याचा निर्णय**

शेतकऱ्यांना रासायनिक खत पुरवठा करताना जबरदस्तीने इतर वस्तू विकत घेण्यास भाग पाडणाऱ्या खत पुरवठाधारकांविरोधात कायदेशीर लढा उभारण्याचा निर्णय आ. मुनगंटीवार यांनी घेतला आहे. त्याचाच भाग म्हणून आज तक्रार दाखल करण्यात आली.

# ज्येष्ठ नागरिकांच्या सुखकर प्रवासासाठी मुंबई लोकलला लागणार स्वतंत्र डबा

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०६, मुंबई :** मुंबईची लोकल ट्रेन ही समस्त मुंबईकरांची लाईफलाईन मानली जाते. दररोज लाखो प्रवासी या लोकलने प्रवास करतात. यामध्ये पुरुष आणि महिला प्रवाशांसोबतच ज्येष्ठ नागरिकांची सख्या सुद्धा मोठी असते. याच जेष्ठ नागरिकांच्या प्रवासाला अधिक आरामदायी आणि सुखकर बनवण्यासाठी रेल्वे प्रशासनाने आता एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून त्याबद्दलचे रचनात्मक बदलही करण्यात आले आहेत. या निर्णयाचा फायदा ज्येष्ठ नागरिकांना होणार आहेत. रेल्वेने प्रवास आरामदायी होण्यासाठी लोकलचा मालडबा ज्येष्ठ नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. मध्य रेल्वेने माटुंगा कारखान्यात लोकलच्या मालडब्यात बदल करून ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र आकर्षक डबा तयार झाला आहे.



मध्य रेल्वेवरील प्रत्येक लोकलमध्ये प्रवाशांची प्रचंड गर्दी असते. लोकलमध्ये प्रथम श्रेणी, द्वितीय श्रेणी असे डब्याचे प्रकार आहेत. तर, महिला, दिव्यांग आणि मालवाहतुकीसाठी स्वतंत्र डबे आहेत. गरोदर स्त्रियांना आणि ज्येष्ठ नागरिकांना लोकलच्या डब्यात काही आसने राखीव आहेत. मात्र, ज्येष्ठ नागरिकांना गर्दीतून प्रवास करणे कठीण होते.

लोकलमधील गर्दीचा विचार करता ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या राखीव आसनापर्यंत पोहोचणे अशक्य होते. त्यामुळे मध्य रेल्वेने लोकलच्या माल डब्यात बदल करून ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र डबा तयार केला आहे. त्यामुळे पहिला लोकल रेक तयार झाला असून येत्या काळात मध्य रेल्वेवरील सर्व रेकमध्ये बदल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.रेल्वे मंडळाच्या निर्दे शानुसार, माटुंगा कारखान्यातील पथकाने, लोकलच्या मालडब्याचे रूपांतर करून ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी स्वतंत्र डबा तयार केला आहे. या डब्यामुळे लोकलम ध्ये चढताना, उतरताना ज्येष्ठ नागरिकांना येणाऱ्या अडचणी कमी होतील आणि आरामदायी आणि सुरक्षित प्रवास सुनिश्चित होईल, अशी माहिती मध्य रेल्वे प्रशासनाने दिली.दरम्यान या डब्यात आसन व्यवस्था वाढवून १३ प्रवाशांना बसता येईल, एवढी आसने या नव्या रचनेमध्ये असणार आहेत. तसेच प्रवाशांची सुरक्षितता वाढविण्यासाठी दरवाजाच्या पायदानाखाली आपत्कालीन शिडी देखील बसवली आहे. माल डब्याच्या दरवाज्याजवळ पूर्वी खांब नव्हता. परंतु आता या डब्यात बदल करताना दोन्ही दरवाज्याजवळ खांब लावण्यात आला आहे. तसेच लोकल डब्यात आकर्षक देखावे सुद्धा लावण्यात आले आहेत. मुंबई उपनगरीय रेल्वेतून ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी, दिव्यांग प्रवाशांप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र डबा उपलब्ध करण्याची मागणी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिकेद्वारे केली होती. ज्येष्ठ नागरिकांसाठी लोकलमध्ये स्वतंत्र डबा उपलब्ध करून दिला जाईल, असे रेल्वे प्रशासनाने न्यायलयाला आश्वासित केले होते. तसेच लवकरात लवकर कार्यादेश करण्याचे न्यायालयाने रेल्वे प्रशासनाला दिले होते. त्यानंतर पश्चिम रेल्वे प्रशासनाने हे काम करण्यास सुरुवात केली. त्यामागोमाग मध्य रेल्वेने सुरुवात केली आहे.

# थोडक्यात

## जिल्हा परिषद केंद्र शाळा शेरे येथे आषाढी वारीचा कार्यक्रम



**अक्षराज : गणेश गायकर**

**दि.०५, शहापूर (ठाणे) :** शेरे या गावांमध्ये जिल्हा परिषद केंद्र शाळा शेरे या शाळेत वारकरी संप्रदायाची एक अत्यंत महत्त्वाची मुलांनी वारी साजरी केली. मुख्याध्यापिका सुजाता गाडगे यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे या वारीत वारकरी पंढरपूरकडे जातात आणि विठोबाच्या चरणी माथा टेकवतात. ज्यात वारकरी, महिला, मुले, आणि वृद्ध सर्वजण सहभाग घेतात. वारीचे गीत, भजन, आणि अभंग यांचे गायन भक्तांना आध्यात्मिक आनंद देतात. त्याच प्रमाणे जिल्हा परिषद केंद्र शाळा शेरे या शाळेतील मुलामुलींनी विविध वेशभूषा तसेच विठ्ठल रखुमाई वेश बरिधान करून विठूचा वारीत तल्लीन झाले. त्याचबरोबर शुभांगी शिंदे, अर्चना मोरे, प्रेरणा जाधव या शिक्षकांनी ही विठ्ठल भक्तीचा जागर केला. संपूर्ण शाळा व गावकरी भक्तिमय झाले विठ्ठल नामाचा गरज शेरे गावात घुमाला विविध खेळ गाणी भक्ती गीते वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना आध्यात्मिक आनंद मिळतो. वारकरी एकमेकांना माऊली म्हणून संबोधतात आणि सर्वजण एकत्र येऊन विठोबाच्या भक्तीत मग्न होतात. वारीतून शेरे गावातील एकता, प्रेम आणि समर्पणाचे दर्शन घडते. वारकरी संप्रदायात कोणताही भेदभाव नसतो आणि सर्वजण एकत्र येऊन विठोबाच्या भक्तीत लीन होतात. हे शेरे गावातील शाळेतील मुलांनी साजरा केला.

## राजे प्रतिष्ठान न्यु इंग्लिश स्कुल खंडुखैरेवाडी येथे पालखी सोहळा संपन्न

**अक्षराज : शरद भगत**



**दि.०५, खंडुखैरेवाडी (बारामती) :** आषाढी एकादशी निमित्त राजे प्रतिष्ठान न्यु इंग्लिश स्कुल चा पालखी सोहळा कार्यक्रम मोरगाव या ठिकाणी संपन्न झाला. आषाढी एकादशीच्या निमित्ताने संपूर्ण राज्यभरात विठुरायाच्या दर्शनासाठी संताच्या पालखी पंढरपुराकडे जात असतात. ही संस्कृती भावी पिढीला समजण्यासाठी व परंपरा कायम चालू राहावी. यासाठी खंडुखैरेवाडी येथील राजे प्रतिष्ठान न्यु इंग्लिश स्कुलच्या वतीने पालखी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या पालखी वारीमध्ये नर्सरी ते दहावी चे विद्यार्थी वारकरांच्या वेशभुषेत दिंडीमध्ये सहभागी झाले होते. राजे प्रतिष्ठान न्यु इंग्लिश स्कुलवर या पालखीचे गोलरिंगण पार पडले. तर मोरगाव या ठिकाणी विद्यार्थ्यांनी वारकरी फुगडी, लाठी काठी, लेझीमचे तसेच आकर्षक कार्यक्रम सादर केले. पालखी मयुरेश्वर मंदिरात जाऊन गणपती बाप्पाचे दर्शन घेऊन विद्यार्थ्यांना पाणी व थोडा अल्प प्रहार देण्याात आला. राजे प्रतिष्ठान न्यु इंग्लिश स्कुल हा पालखीचा कार्यक्रम १८ वर्षांपासून राबवत असून विद्यार्थ्यानां आपल्या संस्कृतीचा वारसा समजावा यासाठी राजे प्रतिष्ठान हा कार्यक्रम राबवत असते.

वारीमध्ये सर्वधर्मातील, सर्व जातीतील विद्यार्थी ही सहभागी झाली होती. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी राजे प्रतिष्ठान न्यु इंग्लिश स्कुलच्या सचिव मनिषा खैरे, प्राचार्या वनिता कस्तुरे व सहशिक्षिका मीना तावरे, प्रतिक्षा ताकवले, वैशाली भोंडवे, विचारे सई, राहुल यादव, राजाराम खैरे, मोनाली भोसले, सारिका भोंडवे, कोमल गार्डी, साक्षी भोसले, प्रज्ञा बालगुडे, सायली कोरफडे, शुभांगी जाधव, सुमित जगदाळे यांनी जास्त मेहनत करून विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली. विद्यार्थ्यानां मोरगाव या ठिकाणा पर्यंत बसने सोडवण्याचे काम सर्व बस चालकांनी केले. अशी माहीती वैभव जराड यांनी दिली. या पालखी सोहळ्याचे दर्शन घेत विद्यालयाला शुभेच्छा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिलिप आप्पा खैरे यांनी दिल्या.

## आषाढी एकादशीनिमित्त लिटल चॅम्प स्कूल ची दिंडी



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०५, धाराशिव :** विठ्ठल नामाची शाळा भरली.. अशा विठ्ठल नामाच्या गजरात आषाढी एकादशी निमित्त शहरातील तांबरी विभागातील लिटल चॅम्प स्कूलमधील चिमुकल्यांनी भक्तीमय वातावरणात दिंडी काढली. चिमुकल्यांच्या या दिंडीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

आषाढीच्या पूर्वसंध्येला चिमुकल्यांनी हरिनामाचा गजर करून परिसर दुमदुमून सोडला. या दिंडीत बालवारकरी हातात भगव्या पताका, टाळ, मृदंग, वीणा घेऊन सहभागी झाले होते. चिमुकल्यांनी दिंडीत पांडुरंग-रुक्मिणी, संतांच्या वेशभुषा, पालखी, टाळ, मृदंग घेऊन पारंपारिक वेशभूषेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. बाल वारकऱ्यांच्या या दिंडीचे नागरिकांनी कौतुक केले. दिंडीसाठी शाळेतील शिक्षक, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# बल्लारपूर येथील घरफोडी प्रकरणी २ आरोपींना मुद्देमालासह अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** बल्लारपूर बामणी येथील म ुलचंदानी ले आऊट, टीचर कॉलनी येथे इस्तायिक अली जाकिर अली सय्यद यांचा घरी २ ते ३ जुलै चा मध्यरात्री चोरांनी घराचा मुख्य कुलूप फोडून घरात प्रवेश करून सोन्याचे बारी, अंगुठी, चैन, मंगळसूत्र असे एकूण ५० ग्रॅम दागिने सह जुना वापरता मोबाईल, नगदी असे एकूण २ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरांनी लंपास केले आहे.

दिनांक ०५ जुलै २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर चे पथक गुन्हेगार शोध मोहीम राबवत असताना रेकॉर्ड वरील गुन्हेगार अतुल उर्फ मुजोर विकास राणा (२६) रा. भगतसिंग वार्ड बंगाली कॅम्प चंद्रपूर आणि ऋषेश उर्फ कोब्रा चंद्रभान आत्राम (२४) रा. विसापूर यांनी बल्लारपूर पोस्ट हद्दीत घरफोडी केल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर दोन्ही गुन्हेगारांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी बल्लारपूर येथे घरफोडी केल्याचे कबुली दिले. आरोपी कडून बल्लारपूर येथील घरफोडी येथील सोन्याचे मंगळसुत्र, सोन्याची एक चैन, सोन्याची दोन आंगठी, चोरीस गेलेला रेडमी कंपनीचा मोबाईल, रोख ४००/- असा एकुण १ लाख ५३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केले.

रामनगर पोलीस स्टेशन हद्दीत घरफोडीचे दोन गुन्हे आणि राजुरा हद्दीत एक मोटार सायकल चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिले आहे. राजुरा हद्दीतून चोरी केलेली होंडा शाईन मोटार सायकल क्रं एम एच ३४ एक्स ५१५९ किंमत ४० हजार रुपये जप्त केले. आरोपी याच दुचाकी चा वापर करून घरफोडी करत होते. तसेच पो.स्टे. रामनगर अप.क्र. ४८४/२०२५ आणि ५७०/२०२४ कलम ३०५ (ए), ३३१(३) भारतीय न्याय संहिता गुन्ह्याचा छडा लागला आहे. आरोपी कडून एकुण १ लाख ९३ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात येवुन आरोपींना बल्लारपूर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

आज बल्लारपूर पोलीसांनी आरोपी कडून घरफोडी मधील मुद्देमाल हस्तगत केले असून आरोपींना न्यायालयात पोलीस कोठडी ची मागणी केली असता न्यायालयाने आरोपींना एमसीआर देऊन तुरुंगात रवानगी केली.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचे नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक कांक्रेडवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक बलराम झाडोकर, पोलीस उपनिरीक्षक संतोष निंबोरकर, पोलीस उपनिरीक्षक सर्वेश बेलसरे, पोहवा जयसिंह, गणेश मोहुर्ले, नापोअं संतोष येलपुलवार, पोअं नितीन रायपुरे, मिलींद जांभुळे सर्व स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांनी केली आहे.